# धु वा धा र

विनोदी, विडंबनात्मक आणि उपहासात्मक कवितांचा संग्रह

१९५८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १४९२

बाबुलनाथ

REFBK-C010042
REFBK-0010042

कॉण्टिनेण्टल प्रकाशन, टिळकरोड, पुणें २



आधुनिक प्रख्यात कवींच्या कवितांचा अभ्यास, त्या कवितांतील शाब्दिक व कल्पनानिष्ठ विक्षिप्तपणाचें संशोधन, अभिजात विनोदबुद्धि, भाषेवर प्रभुत्व इ० गुण विडंबक कवीच्या अंगीं अवश्य असतात. बाबुलनाथांचे ठिकाणीं हे गुण असल्यानेंच त्यांच्या लेखनांत चटकदारपणा व मार्मिकपणा आला आहे.

आचार्य अत्रे सोडले तर स्वतंत्र विनोदी कविता लिहिण्यांत बाबुलनाथाइतका दुसऱ्या कोणत्याही कवीचा हातखंडा दिसत नाहीं.

त्यांच्या विडंबन काव्यांत वैयक्तिकरीत्या किंवा सार्वजनिक कुचाळी नसल्यानें त्याचें स्वरूप अधिक आल्हाददायक झालें आहे. विषय हेरून विडंबनाचें हत्यार वापरतांना त्यांनीं बरीच सावधगिरी बाळगलेली दिसते. त्यांच्या कवितांतून प्रतिभेची चमक निःसंशय दिसून येतें.

(प्रकाशित
पुस्तकांच्या अभिप्रायांतून)

# धुवाँधार



– बाबुलनाथ

# धु वा धा र

विनोदी, विडंबनात्मक आणि उपहासात्मक कवितांचा संग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २३४२५ दि: ......
क्रमांक ...९७१२... नों: दि: ३०-१-७५

बाबुलनाथ

REFBK-0010042

REFBK-0010042

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१००४२

कॉन्टिनेण्टल प्रकाशन, टिळकरोड, पुणें २

प्रकाशक :
अ. अं. कुलकर्णी
कॉन्टिनेण्टल प्रकाशन,
टिळक रोड, पुणें २

सर्व हक्क कवीचे स्वाधीन
किंमत : साडे तीन रुपये
आंतील चित्रें : हरिश्चंद्र लचके
मुखपृष्ठावरील चित्र : फडणीस.
प्रथमावृत्ति : १९५८

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव, पुणें २

माझा धाकटा भाऊ

**डॉ. रामचंद्र शामराव काळे**

यांस —

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ............ नों: दि: ............

## शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३१ | २४ | वत्तपत्रीं | वृत्तपत्रीं |
| ४६ | १५ | नाकरि | नोकरि |
| ९० | २ | अजुनहा | अजुनही |
| १०५ | ६ | वद्याचेंही | वैद्याचेंही |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

## निवेदन—

आज दोन अडीच तपें झालीं. माझें काव्यलेखन अजून थांबलेलें नाहीं. तें कधीं ससा तर कधीं कांसव या दोघांच्या गतीप्रमाणें अनेक उद्योग संभाळून चालू आहे. या दोन अडीच तपाच्या कालावधींत माझें आकाशगंगा (१९३५), जलधारा (१९४१), मुंग्यांचें वारुळ (१९४५), प्रभंजन (१९४९) असे चार काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले. पैकीं 'आकाशगंगा' या काव्यसंग्रहाची दुसरी आवृत्ति (१९४१) काढावी लागली आणि आतां प्रकाशित झालेल्या या चारही संग्रहांच्या प्रति बाजारांत कोठेंच उपलब्ध नाहींत.

माझ्या कवितेचे मुख्यत्वेंकरून दोन भाग पडतात. एक विनोदी, विडंबनात्मक व उपहासात्मक कवितांचा विभाग व दुसरा गंभीर कवितांचा विभाग असे होत. या दोन्ही विभागांत अंतर्भूत होतील अशा सुमारें २००।२५० कविता माझ्याकडून आतांपर्यंत लिहून झालेल्या आहेत. जुन्या पुस्तकांची तशीच आवृत्ति काढण्यापेक्षां नवीन तऱ्हेनें माझ्या निवडक प्रसिद्ध व अप्रसिद्ध कवितांची मांडणी यापुढें रसिकांस सादर करण्याचें मी योजिलें आहे.

'धुवाधार'—या काव्यसंग्रहांत फक्त विनोदी, विडंबनात्मक व उपहासात्मक कवितांचाच समावेश केलेला आहे. पूर्वींच्या चारी पुस्तकांतील निवडक कविता व त्या संग्रहानंतरही वेळोवेळीं साप्ताहिकांत व मासिकांत प्रसिद्ध झालेल्या कांहीं कविता तर कांहीं अगदींच नवीन व कोठेंही प्रसिद्धीस न पाठवलेल्या अशा कविता या संग्रहांत घातलेल्या आहेत. या काव्यसंग्रहांत कोणकोणत्या कवितांची निवड करावी याबाबत सुप्रसिद्ध विनोदी लेखक श्री. चिं. वि. जोशी, मित्रवर्य श्री. गो. ल. आपटे व कविमित्र प्रा. वा. भा. पाठक यांचें साहाय्य मी घेतलेलें आहे. त्यांनीं दिलेल्या आपुलकीच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहे

पुस्तक सर्वांग सुंदर करण्याच्या दृष्टीनें कांहीं महत्त्वाच्या कवितांस अनुरूप अशीं चित्रें सुप्रसिद्ध आर्टिस्ट श्री. हरिश्चंद्र लचके यांच्याकडून काढून घेतलीं आहेत. श्री. लचके यांनीं केलेल्या गोड कामगिरीबद्दल माझ्याप्रमाणें रसिकही त्यांचें कौतुक करतील यांत शंका नाहीं.

पुस्तकाच्या वेष्टनचित्राची अभिनव कल्पना सुप्रसिद्ध चित्रकार श्री. फडणीस यांची आहे. आनंद मुद्रणालयाचे मालक श्री. य. गो. जोशी यांनीं हें पुस्तक इतर कामांची गर्दी असतांनाही त्यांतल्या त्यांत सवड काढून सुबक तऱ्हेनें छापून दिलें व कॉण्टिनेण्टल प्रकाशनचे श्री. अनंतराव कुलकर्णी यांनीं तें प्रकाशित केलें त्याबद्दल त्यांना धन्यवाद देऊन ही काव्य-कलाकृति रसिकांस प्रेमादरानें सादर करतों.

'शामसदन'
६० सोमवार पेठ, पुणें २
ता. १ ऑगस्ट १९५८

बाबुलनाथ

****

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
वर्षाव अनुक्रम ................ वि: ........
अनुक्रमांक ........................ नों: दि: ......


| | |
|---|---|
| १. युरोपियन गव्हर्नर, म्हैस आणि फौजदार | २ |
| २. रुईशीं लग्न | ४ |
| ३. द्रौपदी वस्त्रहरण | ६ |
| ४. सावकारी | ८ |
| ५. पाहुणचार | १० |
| ६. कॉलेजांतील सुख | १२ |
| ७. एकेकाची आवड | १३ |
| ८. सुभद्राहरण | १४ |
| ९. पंढरिचा वारकरी | १७ |
| १०. हें चित्र पहा (कवि आणि वस्ताद | २० |
| ११. तें चित्र पहा (कवि आणि मर्कट) | २२ |
| १२. त्याची भूक | २३ |
| १३. गाजराची पुंगी | २४ |
| १४. साखरेवर खास उपाय | २५ |
| १५. भिक्षुकांस निमंत्रण | २६ |
| १६. तिचा मंगळ | २७ |
| १७. चोरटी | २८ |
| १८. पाऊस पुरवला | २९ |
| १९. म्हातारचळ | ३० |
| १०. दत्तक | ३२ |
| २१. वधू-संशोधन | ३३ |
| २२. उंदीर पकडो ! | ३४ |
| २३. कोण हे आई ? | ३६ |
| २४. पत्रें लिहिलीं तर— | ३८ |
| २५. आवाज | ३९ |
| २६. तात्या पंतोजी | ४२ |
| २७. उंच झालों म्हणून— | ४४ |
| २८. पैशासाठीं | ४६ |
| २९. पहिली केस | ४८ |
| ३०. मी आणि मिशा | ५० |
| ३१. भ्रमर | ५२ |
| ३२. उंदराची मावशी | ५४ |
| ३३. पत्नी–प्रेम–विहार | ५६ |
| ३४. पुणेरी पगडी | ५८ |
| ३५ पाय घसरला म्हणून— | ६० |
| ३६. मावशीची आठवण | ६२ |
| ३७. सोनेरी टोळी | ६४ |
| ३८. बेपत्ता कंत्राट्दार | ६५ |
| ३९. जाहीर सभा | ६६ |
| ४०. मास्तर आणि मुलें | ६८ |
| ४१. भविष्य माझें सांगायाला— | ७० |
| ४२. पुराणिकबुवा | ७२ |
| ४३. क्लबाकडील गोष्टी | ७४ |
| ४४. बर्नेट् मारकस् | ७८ |
| ४५. मी आणि मामा | ८० |

४६. बुरखेवाला ८२
४७. 'लाल' बावटेवाले ८४
४८. नापिकदादा ८६
४९. बाथरूम सिंगर ८९
५०. फोटोग्राफर तो— ९०
५१. पुण्याचे भामटे आम्ही ९२
५२. चोर, साहित्यसेवक आणि मिशा ९५
५३. दोन बायकांचा दादला ९६
५४. बघावयास आलों, पण— ९८
५५. बेफाम बकरा ! १००
५६. कवींनो ! १०२
५७. वांझ १०४
५८. माझी नोंकरी १०६
५९. संस्कृतिसंरक्षकांचें संमेलन १०८
६०. सासुरवास अर्थात् सूनबाईचें गाणें १११
६१. घे सुरी— ११२
६२. त्याचें संततिनियमन ११३
६३. मी सिनेटोन काढीन ! जगवीन ! ! आणि बुडवीन ! ! ! ११४
६४. सैंपाकीण नव्हे मालकीण ११६
६५. कांहीं म्हणा पण— ११७
६६. नटीच्या नवऱ्याचें गाऱ्हाणें ११८
६७. कावळ्यास आवाहन १२०
६८. गोड गुपित १२३
६९. नटींचा संप १२६
७०. सिनेसृष्टींत आनंदी आनंद ! १२७
७१. तरुणींचा ताफा १२८
७२. घेतली कशीतरी स्वाक्षरी १३०
७३. पापड नव्हे—तिळपापड १३२
७४. नटीचें रडगाणें १३४
७५. तो कारकून—आणि लेखक ! १३५
७६. हाय! हाय! तो भाला!! १३७
७७. गुंड कवि मी — १४०
७८. एखाद्या कवीचें नशीब १४१
७९. अरे! मी राजकवि झालों! १४२
८०. अरे ! मी राजकवि होतों ! १४५
८१. मळमळ १४६
८२. एक मागणें १४८
८३. स्मृति—गीत १४९
८४. गांधिलमाशी १५०
८५. कवितागायन १५२


****


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

# धुवाधार

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# युरोपियन गव्हर्नर, म्हैस आणि फौजदार

( जाति–साकी )



गणेशखिंडीहुनी निघाली गव्हर्नरांची स्वारी
'कौन्सिलहॉला'मधें पोंचण्या भरबारांस दुपारीं !

अकरा वाजुन जातां धांदल पोलीसांची होई
कडक पहारा रस्त्याला तो होता ठायीं ठायीं !

'स्वारी' निघतां जिकडे तिकडे होई कर्कश शिट्टी
सज्ज राहुनी पोलिस तेव्हां मार्ग रोखुनी धरती !

चौकाचौकावरीं थांबली वहातुक लोकांची ती
टांगे, मोटारी अन् गाड्या पुढें न कांहीं जाती !

गाइ-म्हशींना आवरुनीही गवळीदादा कोठें
रस्त्याच्या बाजूस राहिले खडेच जेथें तेथें !

भरकन् धांवत गव्हर्नरांची नजीक मोटर आली
' ससून इस्पीतळा ' समोरीं गंमत कसली झाली?

अफाट गर्दी बघून आणिक शिव्या ऐकुनि कानीं
भली दांडगी म्हैस बुजूनी धांवत सुटली कोणी !

धांवत धांवत रस्त्यामध्यें येइ आडवी अगदीं
बाजुस करतां तिला अखेरीं थकले पोलिस दर्दी !

फौजदारानें दंडे मारुनि जर्जर तिजला केलें
जागेची परि ती न हालली ! उपाय सारे हरले !

अंवतीं भंवतीं गडबड आणिक हंशा, ओरडा चाले
भली म्हैस ही खाष्ट भेटली ज्याला त्याला गमलें !

क्षणार्धांत तों गव्हर्नरांची मोटर तेथें आली
रहदारी ती खुली न बघतां खोटी त्यांची झाली !

दोनच मिनिटें मोटर त्यांची रस्त्यामध्यें थांबे
उशीर तितुका झालेला पण मनांत त्यांच्या झोंबे !

कामावर जो फौजदार त्या जागीं तेव्हां होता
दुसऱ्या दिवशीं लगेंच त्याच्या हातीं पडला खलिता !

" कामांवरुनी दूर तुम्हांला, आजपासुनी केलें "
' फौजदारांला म्हैस भोंवली ' हंसून जो तो बोले !

****

# हईशीं लग्न

( जाति-चंद्रकला )



एका मागुन त्या
वर्षा वर्षाला
बायका लग्नाच्या दोन्ही
हाय ! मज गेल्या सोडोनी !

पुन्हां एकटा मी
पैसा असुनीही
राहिलों भरल्या जगतांत
सौख्य कां नाहीं नशिबांत !

पत्रिका न बघतां
'मंगळ' कां मजला ?
दोन तीं लग्नें मम झालीं
अतां पण शंका ही आली !

पत्रिकेंत माझ्या खरोखर 'मंगळ' सांपडला
अन् मंगळधारी मुलीशीं विवाह नव ठरला !

शास्त्राधारपरी अचानक कां आडवा यावा
विवाह तो तिसरा अगोदर 'रुईशीं' लावावा !

कोण 'रुई' ऐशीं तिचें अन् कोठें वास्तव्य
नशिबाला माझ्या कोठुनी येई हें दिव्य ?

'रुई' न ती भेटें कुठें मज हिंडुनि शहरांत
भटजींच्यासंगें अखेरीं गेलों रानांत !

वणवण फिरतांना भयानक वादळ तें उठलें
पाऊसहि आला जिणें हें नको नको गमलें !

फिरतां फिरतांना अखेरीं अवघड जागेंत
रोप 'रुईचें' तें कसेंतरी पडलें नजरेंत !

भटजींच्या संगें मला मग मोद किती झाला
सोडुनि सुस्कारा लागलों मंगल कार्याला !

प्रिया 'रुई' बघतां कसेंसें होउनि मज गेलें
(प्रेम तिच्यावरती मुक्यानें मज करणें आलें !)

धांदल भटजींची उडाली लगीन घाईंत
मंत्रांनीं त्यांच्या लोटलें मजला खाईंत !

परवड नशिबाची अजूनी नाहीं पण सरली
लग्न लागतांना प्रिया कां माझी थरथरली !


मंगल घडतांना भडकलें वादळ जोरांत
'रुई' बिचारी ती कडाडुनि पडली निमिषांत !

भटजींनी केला अखेरी अंतःपट दूर
मृत पत्नीला मी घातला कसाबसा हार !!

****

# द्रौपदी वस्त्रहरण

( जाति-केशवकरणी )



मोटर सायकलवरी कोण हे आवाज कर्कश करून्
निघाले नव्या पुलाच्यावरून् ?
डॉक्टर ‘ दुःशासन ’ पुढतीं अन् मागें ती ‘ द्रौपदी ’
सुंदरी नर्स असे सोबती !
नागिण ती केतकांस विळखा घालुनि राही जशी
तयां ती धरून बैसे तशी
शुभ्र पांढरे झिराझिरीतसे पातळ मउ मलमली
गोल तें होती ती नेसली !

तंग तयांवर निळा जांभळा 'ब्लाउज' तो काश्मिरी
आंतुनी 'बॉडी' श्वेतांबरी !

केसांचा तो पाठीवरती सैल शेपटा रुळे
गुल्छडी वेणी त्यांवर खुले !

नवजवान तो डॉक्टर काळा धिप्पाडी रांगडा
शिपाई शोभे जाडाजुडा !

अतिवेगानें दिली तयानें सोडुनिया 'फट्फटी'
उडत कीं दारूची सोंगटी !

वेगामध्यें मोटर सायकल धांवत जातां बरें
नर्सला तोल तिचा नांवरे !
गुरफटून पातळ तिचेंच चाकामधें
फट्फटी पुढें अन् मागें ती आपटे
पर्करावरिल तें वस्त्र फाटुनी फिटे

'वस्त्र-हरण' तो करून गेला भरकन् दुःशासन
हांसती रस्त्यांतिल दुर्जन !!

****

# सावकारी

( वृत्त-वारुणी )




( कवि यशवन्त ! असूं द्या माफि, करा दिलसाफि )

येइं भाई येथ पाहीं थाटली ही सावकारी
धर्मजाती येथ कांहीं भेद ऐसा ना विकारी !

दैन्यतेचा हा कडाखा दुर्दशा होई जिवाची
ह्या जगीं पैसाच त्राता त्याविना प्राणी भिकारी !

खर्चराशी जीवनीं बोकाळुनी त्या गांजताती
तुंबते बाकी सदा अन् होइ देणें दारिंदारीं !

तोंड ना ये दाखवाया भंडवीतो दंडधारी
दीन-बंधो ! मांडिली ही तूझियासाठीं उधारी !

खानदानी शेठ कोणी वंशजी त्यांच्याच पेढ्या
थाटल्या काढून सोयी सवूलतीच्या बेसुमारी !

नाडल्या जीवांस येथें द्यावयातें कर्जपाणी
मारवाडी मात्र माझें व्याज ही माझी खुमारी !


थोडिशी वा फारही घे कर्जसंख्या लागणारी
मुक्त कर्जातून हो त्या ! येउं दे अंगीं हुषारी

फेडतां सव्याज देणें होउनी नादार अंतीं
जो दगा देशील दुष्टा ! तेवढी हानी हमारी

****

# पाहुणचार

( वृत्त–वसन्त )




( पौराणिक काळांत प्रभू रामचंद्रासाठीं शबरीनें केलेल्या आदरातिथ्याची पूर्वतयारी व हल्लींच्या सुधारलेल्या काळांत पाहुण्याच्या आगमनाची चुणूक लागतांच होत असणाऱ्या स्वागताची पूर्वतयारी यांमध्यें जमीन अस्मानाचें अंतर असल्यास आश्चर्य तें काय ? हा काळाचाच प्रभाव ! )

" मुलांनो ! पाहुणा कोणी उद्यांला एक येणार
घरांला खर्च ह्या आतां पुरा गांजून घेणार !

तुम्हां कोठूनिया ठावा कसा तो पाहुणा आहे ?
भटाला ओसरी देतां पथारी मांडुनी राहे !

उद्यां पाहाल डोळ्यांनीं सुखें तो घेत आराम
मनीं लागाल चिंताया ' कधीं बोलेल हा राम ' !

बघूनी ' काळ ' तो ऐदी मला संताप येईल
चुकूनी त्या भरामाजीं नको तें तोंड बोलेल !

तुम्ही योजाल ना युक्त्या ? ' नको तो यावया करुनी '
पहा पर्गांव गांठाया तयारी आज ' तिकडूनी ! '

कुठें गावांस ' ते ' गेले—कशाला–केधवां ? कांहीं
विचारी पाहुणा जर तो--( कसें बोलुं ग मी बाई ? )

उद्यांला पाहुणा येवो ! तुम्हां आधींच घेऊन
घरांला लावुनी टाळें; सुखें माहेर गांठीन ! ! "

****

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्वक्रमत.
अनुक्रम 23425 वि. 3104
क्रमांक 9772 नों. दि. 30195

# कॉलेजांतील सुख

( जाति–केशवकरणी )

( ' कॉलेजांतील सुख ' हें ' शेतकीतील सुखा ' पेक्षां लाखो पटींनी सुखकर असतें—असा कोणता कॉलेजकुमार कबूल करणार नाहीं ? )

दक्षिण–उत्तर मंद मंद तो वाहे जलवाहक
कालवा सरितेचा बालक !
मागें ती टेकडी तियेच्या खालीं झाडींतुन
आमुचें सुरम्य ' फर्ग्यूसन ' !
चहुंकडे आवारामधें हवा ती खुली
विविधशा फुलांनीं बाग मधें शोभली
त्यांतुनी तरूवर गाते विहगावली
विद्या देवीचें स्थल ऐसें नंदनवन भासलें
म्हणूनी गाणें हें गाइलें !

शाळेनंतर इथें शिकाया गांव, जनां सोडुनी
राहिलों वसतिगृहीं येउनी !
स्वतंत्रता–साम्राज्य बघूनी मज्जिव वेडावला
चालला नित्यक्रम हा भला—
उठुनियां उशीरां ' टेनिस ' तें खेळणें
स्वादिष्ट भोजनें क्लबामधें झोडणें
क्लासांत ' 'सुटा'नें घंटेला पोंचणें

लहर लागतां तास बुडवुनीं गांठुनि लायब्ररी
वाचणें नाटक, कादंबरी !

'सिगार', 'स्नफ्' ओढीत करावी सहल मजेनें कधीं
मुलींसह रंगुनि प्रेमामधीं !
नाट्य–सिनेमा रोज बघावा मित्रासह जाउनी
करावी चैन तशी 'खाउनी' !
'रोमान्स' करावा त्यांतुनि तो सुंदर
लागेल तशी मागणें 'मनी ऑर्डर'
टाळणें परीक्षा जडुनि 'परीक्षा–ज्वर'
लाख पटींनीं हें न सुखद कां कॉलेजी जीवन ?
नको तें खेडयांतिल राहणं ! !

( फर्ग्युसन कॉलेज १९२९ )

****

## एकेकाची आवड !

( जाति—चंद्रकला )

देवाची दासी — तिला तो पोपट आवडतो
सिनेनटीला त्या — नेमका कुत्रा पण रुचतो !


खानावळवाला — बाळगी मांजर प्रेमानें
संस्थानिक मोठा — पोसतो हत्ती ऐटीनें !

दरवेशी फिरतो — बरोबर अस्वल घेऊन
प्राध्यापक कोणी — राहतो माकड पाळून !

****

# सुभद्राहरण

( जाति–केशवकरणी )




नाटक तें ' सौभद्र ' लागलें थिएटरवर आजला
अमूपहि प्रेक्षकगण लोटला !

नाटक ती कंपनी नविन हो नांवहि मिळवूनिया
स्त्रियांचीं कामें करती स्त्रिया !

प्रयोग सुंदर ' सौभद्राचा ' बघावया त्यांतुनी
जहाला आतुर जो तो मनीं !

पहिली आणिक दुसरी घंटा घणघण ती वाजली
भयंकर आतुरता वाढली !

गेले साडेदहा वाजुनी तिसरी घंटा परी
अजूनी झडली ना लौकरी !
लागले लोक मग करावया खळबळ
टाळ्या नि शिट्यांचा माजे कोलाहल
आरडा ओरडा चालेही तुंबळ

हाय ! परंतू तिसरी घंटा अजुन कशी ना झडे
ड्रॉपचा पडदा वर ना चढे !

चिडून जो तो मनांत बोले-" नाटक नच आज कां
जायचा पैसा कां तो फुका " ?

कंपनीस ह्या काय म्हणावें ? जो तो रागावला
शिव्यांचा वर्षावहि जाहला !

घोर अचानक संकट आलें काय कंपनीवरी
म्हणूनी बंद खेळ कां तरी ?

क्षणाक्षणाला गडबड आणिक गोंधळ तो माजला
भयंकर प्रेक्षकजन खवळला !

'केलें ' एप्रिल-फूल ' प्रेक्षकां पैसे घेउनि बरें '
अशीही वार्ता पसरे त्वरें
इतुक्यांत जहाला बार फटाक्यापरी
अन् तिसरी घंटा झडुनि अखेरीं खरी
हळुहळूं '.ड्रॉपचा ' पडदा गेला वरीं

स्टेजवरीं ' रंगून ' बोलला ' अर्जुन ' तो मालक
( ऐकती मुकाट मग प्रेक्षक ! )

" नाटक तें ' सौभद्र ' संपलें आज आमुचें बरें
कुणांला गमेल कां तें खरें ?
काम ' सुभद्रा ' करणारी ती नविन नटी सुंदरी
रंगुनी तयार होती जरी !

मागिल दारानें तिज कोणी नेउनि मोटारिंत—
पळविलें, कसें न तें माहित !

हां हां म्हणतां ' हरण ' तियेचें जाइ बरें होउन
एकटा उरलों मी ' अर्जुन !

खरें ' सुभद्रा-हरण ' जहालें माझें हो प्रेक्षक
कशाचें आतां मग नाटक ?
जा धरुन ' सुभद्रा ' माझी आणा कुणी
करुं नाटक कैसें मीच तिच्या वांचुनी
कंपनी चालणें आतां हो कोठुनी ?
घेउनिया संन्यास चाललों धंदा हा सोडुन
कशाचा मालक मी येथुन ? "

****

# पंढरिचा वारकरी

( जाति—बालानन्द )

वारकरी मी वारकरी  पंढरिचा मी वारकरी !
यात्रा भरते दरवर्षी  पैसा होउनि बहु—खर्ची
सान थोर पोरें बहुत  गांवगांवचे येतात
पंढरि पोरांची असली  मॅट्रिकविण दुसरी कसली ?

दरवर्षाते
जत्रा भरते
गर्दी होते

त्यांत न चुकतो खरोखरी—  पंढरिचा मी वारकरी !

बसुनि सातव्या वर्गांत  वर्षें झालीं मज सात
अभ्यासाचा ये वीट  सुचे न कांहीं मज नीट
मित्र पळाले मजपुढती  दगड न हाले मी अगदीं
पास जाहल्याविण कसला  तरणोपाय न तो मजला

लाज त्यजून
अभ्यासून
पुन्हां फिरून

उरकुनि घेतों 'प्रिलिमिनरी—' पंढरिचा मी वारकरी !

[२]

'फॉर्म' मिळाया त्यांत पुन्हां युक्त्या करितों मी नाना
हेड्मास्तरच्या बाळ्याला करून घेतो मी 'अपुला' !
गुप्त कांहिंशी कामगिरी त्यांवर सोंपवितों सारी
कांम नेमकें तो करितो पास कसा तरि मी होतों

पुढें मात्र ती
पडते भ्रांती !
लागुनि गळती

येतो पहिल्या पदावरी– पंढरिचा मी वारकरी !

प्रयत्न जैसा कोळ्याचा फिरून चाले मम तैसा
'राबर्ट ब्रूस'चा धीटपणा अंगामध्यें येइ पुन्हां
'पप्पू–बानर्जी'–कीज् त्यांचा करितों मी कीस
होते परि मम मंद मती गणीत विषयाच्या वरती !

विषय एक तो
अखेर नडतो
मग मी रडतों–

'येरं माझ्या मागुल्या तरी'– पंढरिचा मी वारकरी !

'जोगेश्वरीला' मी गेलों नवस करूनी मग आलों
'जंग्ली महाराजालाही' बोलुन गेलों मीं 'कांहीं' !
पुन्हां तयारी जोरांत चाले माझी एकांत !
विषय एक तो गणिताचा पास अतां मज होण्याचा

गेला हत्ती
उरे शेंपटी
अतां न भीती

नरकांतुनि निघण्यास वरी– पंढरिचा मी वारकरी !

नशीब आपोआप फिरे — नवल घडूनी येइ खरें
शिकावयाच्या शाळेंत — शिक्षक झालों वशिल्यांत -
ददात फिटली जीवाची — नोकरि लाभे कायमची
'प्रिलिमिनरी'ला नच बसतां — 'फॉर्म' मिळाला मज आतां !

संकट असलें
जरि तें टळलें
मोठें पुढलें !–

नष्ट कराया यत्न करीं — पंढरिचा मी वारकरी !
अखेर युक्ती मज सुचली — बुद्धी कोठुनि ती झाली ?
केंद्र पुण्याचें पालटलें — प्रयाण परगांवीं केलें !
ओळखण्याला तेथ कुणी — मला न, ऐसें पाहूनी
हुषार माझ्या मित्राला — बैसविलें मी परिक्षेला !


निकाल झाला
विजय मिळाला !
तरि मी अपुला–

मनांत म्हणतो परोपरी– — पंढरिचा मी वारकरी ! !

****

# हें चित्र पहा

( वृत्त-शा. विक्रीडित )



( ह्या दोन सुनीतांतील कल्पना माझ्या एका ' सुतकाळ ' कारकून मित्रांस एकाच वेळीं सुचलेल्या आहेत. मात्र त्याला कविता ' होत ' नसल्यामुळें त्यानें हें काम ' अंमळ ' माझ्यावर सोंपविलें. अर्थात् तें माझ्या हातून कितपत पार पडलें हें खुद्द रसिकांनींच ठरवावें. )

## –१– कवि आणि वस्ताद !

गर्जे ठोकुनि दंड कोण कविला वस्ताद जाडाजुडा–
" माझें साम्य तुझ्यामधें दिसतसे हा व्यर्थ नाहीं लढा !
आखाड्यांत पडूनि नित्य असतो व्यायाम घेण्यास्तव
तूंही ना कवि-मंडळांत रुळशी काव्यें करायास्तव ?

होतों खाउनि लट्ठ मी निशिदिनीं खर्जूर अन् खोबरें
घेऊनी परकल्पना नविन ना तूं श्रेष्ठ होशी बरें ?
कुस्त्या मारुनि मी सदैव मिळवीं फेटें तसें कंकण
तूंही मासिक-पुस्तकांत इतरां हाणून घेशी धन !

घेतो हे मम कान मी चढवुनी ऐटींत चालावया
घेशी वाढवुनीच मान अपुला गर्वांत मिर्वावया !
चेले मी करितों तयार, बनुनी त्यांचा गुरू सज्जन ( ! )
तूंही ना प्रसवावयास झटशी चेले गुरू होउन ! "

× × ×

" वस्तादा ! सगळें खरें, कवि वदे, तूझ्यापरी रे कुणी—
खांद्याच्यावरुनी जिवंत मजला मिरवी न रस्त्यांतुनी ! ! "

आणि—

****

## तें चित्र पहा

( वृत्त–शा. विक्रीडित )



### –२– कवि आणि मर्कट

वोले खाउनि दांत सर्व कविला गर्वें कुणी मर्कट
"माझें साम्य तुझ्यामधें प्रकटतें–हें व्यर्थ ना तर्कट !
दोघेही दिसण्यांत एक अगदीं ! आश्चर्य कोठें न कीं
आम्हांपासुनि जाहलीच तुमची उत्पत्ति साऱ्या जगीं !

उद्यानीं फिरतां फळें खुडुनिया पोटामधें घालतों
तूंही चोरुनि शब्दवैभव तसें काव्यामधें कोंबतो !
आहे पुच्छ म्हणून मी करितसे उड्डाण चोंहीकडे
कीर्ती-पुच्छ मिळूनि ना मिरविशी प्रौढी जनांच्यामधें ?

वांकोल्या मज दाविंतांच चिडतो अत्यंत रागावुनी
टीका हो तुझियावरीं तर कसा जातोस फेंदारुनी ?
झालें कांहिंतरी विषाद न मुळीं त्याचा कधीं मानतां
' माझें × × × लाल ' — तत्व अपुलें वारूनि नेई व्यथा." !

× × ×

" दोस्ता ! हें सगळें खरें, कवि वदे, मी ना सुखी अल्पही
टाकी टर्फल ना कुणी मजपुढें खाऊनियां शेंगही ! !"

****

## त्याची भूक !

( जाति—मंजरी )

" बायको असूनी जिवंत पहिली खरी
आणिली कशाला करून दुसरी तरी ? "
हा प्रश्न टाकतां टिचून वदे लेखक—
" शमविण्यास माझी भूक अहा बौद्धिक ! "
नच कोडें सुटलें—' भूक काय बौद्धिक '
जग समजे त्याची भूक मात्र लैंगिक ! !

****

# गाजराची पुंगी

( वृत्त—शा. विक्रीडित )

चाले गोंधळ नित्य काय कसला श्रीशारदामंदिरीं
जावें जेविं तदा तिथें झडतसे आवाज कांहींतरी !
फुंकी ‘ शिंग ’ कुणी सुरू न अगदीं झाली ‘ तुतारी ’ कुठें
देई थाप ‘ डफावरी ’ वडविलें कोणीं न जों ‘ चौघडे ’ !

शाहीरी सरतां सुरेल ‘ मुरली ’ कोणीतरी वाजवी
‘ पांवा ’ ऐकुनि ‘ बांसरी-सनइ ’ ला हाताळताती कवी !
‘ सारंगी ’स्तव भांडतो ‘ तुणतुणें ’ घेऊनि तो ‘ गोंधळी ’
कोणी शाहिर ‘ बँडवादन ’ करी काढून वृत्तें खुळीं !

पोराचा कुणि वाजवीत बसतो ‘ घुंघूरवाळा ’ कुठें
त्याचें पाहुनि ते--कुणी ‘ खुळखुळा ’ घेतोच हातामधें !
काढी ‘ वोल पिपाणि ’ चे रडुनियां काव्यांत कोणीतरी
त्याला साथ करावयास दुसरा हातीं ‘ नगारा ’ धरी !

कोणी घालित ‘ शीळ ’ ती फिरतसे काव्यांत वेड्यापरी
बाधा भूतमयी जडून ‘ कवडा ’ त्या ‘ गर्जना ’ नांवरी !
जो जो तो उठतो ‘ विलाप ’ करितो—मेलें न कुत्रें जरी
‘ बोंबाबोंब ’ तशी—जरी न शिमगा काव्यांत कोणी करी !

वेड्यांचा असला जिथें भरुनियां बाजार गेला असे
मी आतां करुं काय स्वस्थ बसुनी ? हो चित्त वेडेपिसें !

त्यांनीं त्यांत ‘ विडी ’ तशी ‘ चिलिम ’ ना फुंकावया ठेविली
काढूं साधन कोणतें हुडकुनी ? मत्स्फूर्ति चेकाळली !

वृत्ती गाजरपारखी करुनिया त्यांच्यामधें नंतर
जादूच्या पिशवींतुनी नविन मी हें काढितो ‘ गाजर ’ !
‘ पुंगी ’ वाजवितो अतां बनवुनी त्याचीच काव्यांतुन
नाहीं ती जर वाजली तडक मी खाऊनिया टाकिन ! !

एका प्रसिद्ध कवीच्या लौकरच (?) प्रसिद्ध होणाऱ्या ‘ गाजराची पुंगी ’ ह्या कविता संग्रहाचा माझ्या कवितेशीं अर्थाअर्थी कसला काडीचाही संबंध नाहीं हें आधींच सांगून ठेवलेलें बरें ! नाहींतर एखादा पुणेरी ‘ सत्यवादी ’ ( ! ) मलाही ‘ बाताराम ’ म्हणायचा ! !

****

## साखरेवर खास उपाय

( चाल–तुतारी )

साखर मिळते ना बाजारीं
सखये ! तोंवर निश्चय करणें
गोडधोड ना कांहीं खाणें
चहा तसाही बंद ठेवणें
क्रम ठेवुनि पण दिवसा रात्रीं—

दोघांनीही साखर पेरुन
खडीसाखरी बोल बोलणें
साखरझोंपा बळें काढणें
परस्परांनीं आणिक घेणें—
हवे तेवढें “ साखरचुंबन ” ! !

****

# भिक्षुकांस निमंत्रण

( वृत्त-भुजंगप्रयात )

[ स्थळ—जोगेश्वरी नाका. भूमिका—बकंभट उपाध्ये ]

चला भिक्षुकांनो ! अतां ह्या घडीला
उपाध्ये पहा बोलवीती तुम्हांला
चला शांतवायास ती पोट-खाई
तिथें दाखवा थाट तो पेशवाई !

चला घेउनी सर्व चंबू-गवाळें
नका सोडुं तीं बायका आणि बाळें
सदा अक्षदा द्या स्वतःच्या घरांस
असे फर्मवीती उपाध्ये तुम्हांस !

म्हणा काहिंही मंत्र तोंडामधून
कुळाला परी खूष ठेवा वरून !
परब्रह्म तें अन्न खाऊन खास
मुखें देत जा कर्पटी ढेकरांस !

पुरे वल्गना ! पाय जोरांत हाणा
तुम्हां आज जाणें अती लांब जाणा !
नका उन्ह मानूं– चला सर्व थेट
तुम्हांवीण जत्रेमधें शुकशुकाट !

कसा आपुल्या कंबरा, वेळ झाला
चला सोंवळें घ्या पळी आणि पेला !
कुणी दर्भ, पोथी कुणी पंचगव्य
चला घेउनी, साधण्या हव्यकव्य !

निघा सत्वरीं– मोहळीं जेंवि माशा
चला ! वेळ झाला– धरा पंक्ति खाशा !
बसा जेवणासी रडा श्लोक, गाणें
विडा दक्षिणा मात्र ' खोवून ' येणें !

चला भिक्षुकांनो ! अतां ह्या घडीला
उपाध्याय हे बोलवीती तुम्हांला !
चला शांतवायास ती पोट-खाई
तिथें दाखवा थाट तो पेशवाई !

****

## तिचा मंगळ

(जाति—मंजरी)


ही नाजुक, सुंदर बाला माझी किती
मॅट्रीक पास ती पहिल्या वर्गामधीं !
गाण्याची तिजला अवगत आहे कला
सकलांस तिचा सुस्वभाव लावी लळा !

पत्रिकेंत आहे तिच्या परी मंगळ
उजवितां तिला मम सूड पुरा घेइल !

****

# चोरटी

( जाति–मनी )



येते माझ्या घरीं– सख्या ! ही कोण चोरटी तरी ?
घर हें माझें गजबजलेलें
त्यांत तियेची ये जा चाले
मनीं न येतां संशय कसले
मौज वाटते परी– सख्या ! ही कोण चोरटी तरी ?

खमंग येतां वास कोठुनी
कपाट, खिडक्या बघे शोधुनी
मिळेल जें तें गट्ट करूनी
देते हातीं तुरी– सख्या ! ही कोण चोरटी तरी ?

जेव्हां तिजला कांहिं न मिळते
गुरकुनि ती अंगावर येते
कधीं कधीं तर ओरबाडितें
मस्त जाहली खरी— सख्या ! ही कोण चोरटी तरी ?

उंदिर शिरती घरांत जेव्हां
राखुनि परि ती इमान तेव्हां
लढवुनियां तो गनिमी कावा
करी शिपाईगिरी— सख्या ! ही कोण चोरटी तरी ?

( श्री. मंगसुळीकरांचा 'चोर' ह्या 'चोरटीला' ओळखून घेवो ! )

****

## पाऊस पुरवला !

( जाति—मंजरी )

विसरलों घरांतुन छत्री मी घ्यावया
पाऊस भयंकर लागे तो यावया !
राहिलों उभा मी रस्त्याच्या बाजुस
पाहात वाट, थांबेल कधीं पाउस !


इतुक्यांत न कळतां 'माडी'वरुनी कुणी
थुंकिला तांबडा लाल विडा खाउनी !
त्या पिचकारीनें कपडे मम रंगलें
जें नको कसें तें नशिबाला लागलें !

बोललों मनाशीं निघतां झणिं तेथुनी—
पाऊस पुरवला, 'लाल निशाणी'हुनी !

****

# म्हातारचळ

( जाति–मुद्रिका )



वय साठ सरूनी जरी येइ वृद्धता
वरिवरी जरठ हा दावी तरुणाची ती आढयता !

बोळकें मुखाचें बने कधींचें तरी
लावुनी दांत नकली ते करि चर्चा तो हांसरी !

डोक्यास पांढऱ्या सदा ' कलप ' चोळितो
कुळकुळीत केसांचा नी वांकडा भांग पाडितो !

वाढत्या मिशांना तशी चाट देउनी
गालांस मर्दितो ' स्नो ' नें वर ' पावडर ' ती फासुनी !

पोषाख घडीचे तसे बदलतो किती
गणती न तयाला कांहीं, फिरण्यास निघे हा कधीं !

चालती देवळांमधे पुराणें, कथा
हा बगळा तेथें जाई सद्धेतूनें ना कदा !

धार्मीक ग्रंथ ते घरीं पडति धूळित
' नाटकें-मासिकें-माला ' वाचतो हंसत खेळत !

मिष्टान्न गोड खावया रोज नवनवें
डोहाळे त्याला होती जें दिसेल तें तें हवें !

राबती घरांतुनि किती गडी माणसें
हा दोष काढुनी त्यांना बोलतो मुखीं ये जसें !

समजतो स्वतःला शिष्ट आजोबा कुणी
' उपदेश-डोस ' तरुणांना पाजतो बळें हा मुनी !

होतांच रात्र ती तया अचुक फावतें
बाहेर घराच्या त्याचें मन खुशाल तें रंगतें !

तो नाट्य-सिनेमा सदा बघत हिंडतो
कधिकधिं वेष बदलूनी ना तमाशाहि सोडितो !

धन आजवरीं मिळाविलें करुनि नोकरी
उधळून सर्व तें आतां ' मुंबई जिवाची करी ' !

नुकतीच बायको जरी जाय सोडुनी
सारखी वत्तपत्रीं घ्या जाहिरात ही वाचुनी—

'पाहिजे वधू' सुंदरी, सुशिक्षित खरी
अट जात, वयाची नाहीं–( चालेल पोर पक़री ! )
जमतें न लग्न तो तरी व्यर्थ हिंडतो
जी दिसेल स्त्री तिजला तो बारकाइनें पाहतो !
तो पुनर्विवाहाप्रती सज्ज होतसे
'होईन सुधारक मोठा' ! बोलतो ऐटिनें असें।
जमवून कुठें द्या अतां तयाचें तुम्ही
तो येइ हातघाईला वा करिल जिवा कांहिंही !
मरतांच असा तो वृथा भूत होइल
अन् बसून मानगुटीला कोणास तरी धरिल !

****

## दत्तक

( जाति—मंजरी )

मी कशास देवा ! दत्तक हा घेतला
सज्ञान कुठें जों आतां नच जाहला
भांडून भयंकर संपत्ती मागतो
मी मरतों केव्हां वाट सदा पाहतो !

मज वृद्धपणीं हा छळतो बेटा असा
मग मेल्यावरतीं पाजिल पाणी कसा ?

****

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
अनुक्रम 23625 वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

# वधू संशोधन

( जाति-भूपति वैभव )

मित्रः— तुज गड्या आवडे कोण सुंदरी फार ?
श्रीमंत कुमारी बाप जिचा सरदार !

कविवरः— छे ! जरी थोर ती तिला धनाची हांव
हटवादी वेडी करूं घेऊनी काय ?

मित्रः— मग कॉलेजांतिल हवी तुला कां तरुणी
कां सुंदर विधवा सांग गुलाबी राणी ?

कविवरः— छे ! नको पोर ती शिकणारी अभिमानी
अन् मुळीं नावडे दुसरी ‘ सद्गुण-खाणी ’ !

मित्रः— मग मराठमोळी हवी तुला कां साधी
कां जनानखान्यांतली बिबी एखादी ?

कविवरः— छे ! खेडवळीला बळें वरावें कोणी ?
मज रुचे न बघण्या ‘ म्हैस ’ तशी डोळ्यांनी !

मित्रः— मग गड्या ! तुला रे नको वधू का कोणी ?

कविवरः— ‘ दे गाणारी मज कवियित्री आणोनी ’ ! !

[ ‘ नाथा ! ’ पाहुनियां ‘ स्वयंवर ’ तुझें हें होय – ‘ संशोधन ’ ! कवि —‘ साधु कीं सैतान ’ ? ]

****

.३.

# उंदीर पकडो !

( जाति–केशवकरणी )

## ( १ ) इतिहास

महाराष्ट्र देशांतुनि साऱ्या पुंडाई माजली
भयंकर वेळा ती पातली !

शिवरायानें मावळभाई हाताशीं घेउनी
टाकिलें यवनांना त्रासुनी !

अंकित करुनी अनेक किल्ले वाई प्रांतांतले
यशाचें तोरण फडकाविलें !

विजापूरच्या बादशहाला कळतां ही बातमी
जाय तो खवळूनी ना कमी !

' शिवाजिला जो धरून आणिल इनाम त्या देइन '
शहा तो सांगे फर्मावुन !

अफझूलखान तो सिद्ध तया जाहला
'उंदीर गिरीतिल' शिवाजिला बोलला

जातांच धराया प्रसंग ओढावला
वाघनखानें उदर तयाचें शिवाजिनें फाडुनी
दिले त्या स्वर्लोकीं धाडुनी !

× × ×

## ( २ ) वर्तमान

पुण्यपत्तनीं कहर प्लेगचा आज तसा जाहला
धुमाकुळ चहूंकडे माजला !

जिकडे तिकडे उंदिर पडुनी सांथ सुरू जाहली
तियेला लोकहि पडले बळी !

' नगर-पालिका ' सर्व जनांना टोंचुनि देई तरी
सांथ ती हटली ना लौकरी !

सांथ सुरू जी उंदिर करिती—त्यांची संहारणा—
कराया, झाली मग योजना !

' आरोग्याच्या अधिकाऱ्यानें '* जाहिरात काढुनी
दिलें कीं लोकांना सांगुनी—

" प्रत्येकीं उंदरास आम्ही देऊं बारा पया
धरूनी आणिल जो जो तया ! "

जाहला अधाशी कुणी तया तत्पर
उंदीर धराया होउनि बहु आतुर
सन्नीध जों न तो गेला त्याच्या तर

दंश विषारी घडुनि बिचारा पोरांबाळांतुन
अरेरे ! गेला जग सोडुन ! !

****

( * पुणें म्युनिसिपालिटीचे हेल्थ ऑफिसर ! प्लेगसमयीं त्यांनीं काढिलेली जाहिरात— ' धरून आणलेल्या प्रत्येक उंदरास ( सबंध ) एक आणा बक्षीस ! )

# कोण हे आई ?



( श्री. आनंदराव टेकाडे यांची ' कोण हें आई ' ही कविता ज्यांनीं वाचली असेल त्यानां ह्या कवितेंतील रहस्य अधिक कळून येईल. )

( वृत्त–दिंडी )

कण्हत कुंथत किति मंद चालतात
मुखावाटे झणिं शब्द नुमटतात
मान बगळी लुकलुके सर्वदाही
सांग मजला हे कोण तरी आई ?

सदा वदनीं औदास्य पसरलेलें
सोंग रोग्याचें काय हेंच आलें ?
रडे केंव्हां वा विव्हळे कधींही
सांग मजला हे कोण तरी आई ?

केंस डोक्याचे शुभ्र एकजात
तोंड तैसें बोळकें नसुनि दांत !
पडुनि खांचा डोळ्यांस दिसत नाहीं
सांग मजला हे कोण तरी आई ?

पान पिकलेलें खरोखरी भासे
कळत नाहीं कधि गळुनि पडायाचें
बघुनि जो तो हांसून ह्यांस घेई
सांग मजला हे कोण तरी आई ?

जरी साठी उलटून पार जाई
तरि न त्याचें मानून मुळीं कांहीं
झोंक तरुणाचा काय म्हणुनि दावी
सांग मजला हे कोण तरी आई ?

घरिं न कोणी स्वैंपाक करायाला
त्रास म्हणुनी देण्यास आपणांला
अगांतुक हा पाहुणा काय येई ?
सांग मजला हे कोण तरी आई ?

झोंप जेंव्हां लागे न ती अम्हांला
म्हणत होतिस ना ' पहा बुवा आला ! '
तुझ्या हांके कां दैत्य तोच येई
सांग मजला हे कोण तरी आई ?

शब्द ऐसे ऐकून बालिकेचे
दीन मातेला बोलवे न वाचे !
जवळ ओढुनि तिज सुचवि मस्करीनें—
" तुला येती वरण्यांस हे खुषीनें ! "

****

## पत्रें लिहिलीं तर—

( वृत्त—शा. विक्रीडित )

पत्रें तूं लिहिलींस जीं प्रियकरा ( ? ) हुरूडून माझ्यावरी
कोठें धाडुं नकोस तीं पण तुला मीं सांगतें तें करी !
त्वन्नेत्रीं भरलें स्वरूप मम हें वेळांत थोड्या जरी-
होशी तूं न मला पसंत म्हणुनी, घेते परीक्षा खरी !

पत्रांची जमवूनियां सकल जीं ठेवीयलीं बंडलें
लावी आग तयांस, तूं न अगदीं पाहून मागें पुढें !
जेव्हां होइल राख पूर्ण सगळी—फासून अंगावर
संन्यासी बनुनी तुला गिरिवरीं जाणें असे सत्वर !

योग्यांच्यासम तूं समाधि अपुली लावून रात्रंदिनीं
एकांतांत बसून ध्यान करणें !—( माझें कधीं ना मनीं ! )
आशा वाहुं नकोस ती—' मिळुनियां गेली सुभद्रा जरी—
अर्जूनास; तरी तुला न दिसणें मद्देह जन्मांतरीं !!

****

# आवाज

( जाति–पादाकुलक )

ओसाड अरण्यांत फेरफटका करीत असतां कवीला मधूनमधून कसलासा बेसूर आवाज ऐकूं येई ! हा आवाज कसा आला, कोठून आला आणि कोणाचा आला याचा त्यानें कानोसा घेत घेत जंग जंग पछाडलें; पण व्यर्थ ! त्या फंदांत त्याच्या मनाची जी चलबिचल झाली तिचें खालील पद्य हें चित्र होय. मात्र या 'आवाजानें' कै. विनायक कवींचा 'सुवास' अधिक दरवळेल अशी आशा आहे !

मुकाट रानीं हिंडत असतां श्रांत जीव हा रमण्याकरितां
आवाज कर्कश कानीं पडला अधकि जिव त्यायोगें विटला !
निघुनी आला ध्वनि हा कोठें गूढ मला हें पडलें मोठें
धडपडलों जरि ठायीं ठायीं परी सुगावा त्याचा नाहीं
कार्य आणि कारण ह्यांवरतीं वस्तुमात्र चाले ह्या जगतीं
शंकित माझें तैसें हें मन उत्तर देई प्रश्नें काढुन !
भयाणता जी वनांत नांदे दाविण्यास ती भीतीनादें
प्राणी येथें घुबडावांचुन नाहीं कोणी वास करून !
येइ न कोणी या जागेला कांहीं केल्या पुसावयाला
पूर्वी जेथें लोक रहाती तेथें आतां धोंडे माती !
भुताटकीचा सारा खेळ चाले येथें तिन्ही त्रिकाळ
साथ तयाला देण्यासाठीं अगांतुकानें घुबडें येती
संतत करिती ते घूत्कार त्यांचा हा का ध्वनी कठोर ?

× × ×

मुग्धा बाला कुमारिका ती    प्रवेश करुनि यौवनप्रांतीं
सज्ज जाहली विवाहकाला    सुखवस्तू नवरा वरण्याला
व्यंगें अंगांतील परंतू    तडीस नेती तिचा न हेतू
काय करावें कांहि सुचेना    पदरिं कुणाच्या तीच पडेना !
वयमर्यादा लोटुनि गेली    गळ्यांस कधिंची लागुनि ठेली !
आईबापापरी तियेला    ध्यास अंतरीं लागुनि गेला
कॉलेजांतिल एका तरुणा    तिनें भाकली आपुली 'करुणा'
परंतु तो कॉलेज–कुमार    शूर्पणखेला दे न रुकार !
होउनि ऐशी प्रेमवंचना    तिची उडाली दैना ! दैना !
झुरुनी झुरुनी झाली रोड    गंधाचें जणुं झिजलें खोड
आयुष्याची झाली माती    सार्थक नाहीं येउनि जगतीं
यापरि कंटाळून जिवाला    वनांत आली हताश बाला
डोक्यामध्यें येइं विचार    जीव देउनी व्हावें ठार !
पुढें न मागें बघतां कांहीं    वेडावुनि ती धांवत जाई
कभिन्न काळी दरी बघून    उडी टाकली किंचाळून
प्रतिध्वनी जो तेथें घुमटे    कानांवर तो येई वाटे !

× × ×


लांच आणखी वशिला मोठा    प्रयत्न त्यांच्याशंवांचुनि खोटा
नकली मालाला ये भरती    खऱ्याखुऱ्याला पडते भ्रांती
शाहणा त्याचा बैल रिकामा    कोणि न कोणां येई कामा
काव्य–कलेचें होत न चीज    व्यर्थ कवी तो सोसे झीज
काय अशा रसिकांत रहावें    काव्य लिहावें, गाणें गावें
छापित नाहीं कविता कोणी    कुठवर लावायाचें × × ?
जगास ऐशा जावें सोडुन    वनीं रहावें स्वस्थ पडून !
यापरि त्रागावून कवीनें    उठुनी लोकांतून हटानें
केला मोठा गाजावाजा    गर्जत हा कां ध्वनी तयाचा ?

× × ×

ध्वनि-प्रयोजन कळलें नाहीं     उद्भिजही सांपडलें नाहीं
व्यर्थ श्रमलों, झालों बहिरा !   बहिरा ! बहिरा ! बहिरा ! बहिरा !
ध्वनि-प्रयोजन कळुनी चुकतें   उद्भिज त्याचें वा सांपडतें–
खेंचिन त्याला ध्वनिकाव्यांत   शिमग्याचा बघुनी सुमुहूर्त !
ऐकिव असल्या ध्वनिचें ज्ञान   अल्प होतसे जोंपर्यंत न
तोंवर माझी स्फूर्ती मस्त   मूग गिळूनी बसेल स्वस्थ ! !

****

# तात्या पंतोजी



( आठ वर्षांच्या कोमल बालविधवेला पाहून एका प्रोफेसर कवीच्या मनांला एकाएकीं चरका बसला ! आमच्या खेडेगांवांतील तात्या पंतोजीनी शाळा तपासण्यासाठी आलेल्या एका अनपेक्षित व निष्ठुर अक्षा परीक्षकाला ( Inspector ) पाहतांच त्यांच्याही मनाला एकाएकीं भयंकर धक्का बसला ! सहृदय रसिकांनी ' ह्या दोघांत कोणाच्या मनाला जास्त हिसका बसला '—याची आवश्यकता भासल्यास जरूर तो काथ्याकूट आपापल्या कंपूत करावा ! )

( वृत्त—शा. विक्रीडित )

होती वेळ दुपारची कडक ती कंटाळवाणी जिवा
होती बेफिकिरी मुलें मजपुढें अभ्यास तो घ्यावया !
त्यांच्या मठ्ठ्थड बुद्धिला पढवितां नाराज मी होउनी
गेलों विस्मरुनी तयां शिकविणें, झोपेमधें गुंगुनीं !

गर्जे मी उठुनी मधेंच कितिदां—'शिस्तीमधें वागण्या'
अभ्यासावरुनी उडून मन घे त्यांचें परी खेळण्या !
हत्ती जात असे मुकाट स्व-पथीं कुत्री जरी भुंकुन
तेवीं सान मुलांस नाकळुनियां मी चालवीं शिक्षण !

एकाकीं इतुक्यांत कोणि मजला बाहेर हांकारिलें
माझ्या स्वप्नसमाधिंतून मजला भानावरीं आणिलें !
गेलों बाहिर तों भयंकर अती धक्का मना बैसला
शाळेला बघण्या ' परीक्षक ' कुणी दैत्यापरी ठाकला !

शोभा तो करणार खास म्हणुनी, अंगीं भरे कांपरें
एकाकीं अवलोकनें मन पहा होतें किती घाबरें ! '

****

## उंच झालों म्हणून—

( वृत्त—शा. विक्रीडित )



झालों उंच म्हणून मी मज किती तो त्रास होतो बरें ?
सांगू कां समजावुनी पण कुणां वाटेल तें कां खरें ?
आढ्याचें मम मस्तकास बसती दारांत ठोके सदा
गेलों वांकुनि मी तरी न टळतें ती दारुणा आपदा !

एरंडासम उंच पाहुनि मला माझ्या स्वतःच्या घरीं
जो जो तो उठतो निरर्थ मज घे राबून कैंद्यापरी !
'काढा जिन्नस ते फळीवरुनियां ठेवून द्या नी पुन्हा'
ऐशा सक्त मजूरिनें रखडण्या केला जणूं मी गुन्हा !

बाजारीं मिळतें न रुंद मजला कोठें कधीं धोतर
जें जें नेसुनि पाहतां न पुरुनी तें येइ गुडघ्यावर !
जेव्हां मी बसतों पुढें कधिकधीं नाटयगृहाच्यामधें
माझें मागिल सर्व लोक चिडुनी देती बसूं ना सुधें !

तोटा आणिक भासतो हरघडी उंचीमुळें जो मला
सांगू कां अपमान सर्व गिळुनी ? हा जीव वैतागला !
लाभे स्त्री मज ठेंगणी तिजपुढें मी सारखा वांकुन—
झालों जर्जर त्यामुळें न रुचतें 'आलिंगुनी चुंबन' !

× × ×

देवा ! मृत्यु नको कशास्तव तरी बोलो कुणी बापुडें
देवा ! आयु नको तुला विनवितों होणें जरी उंच तें ! !

****

## पैशासाठीं ! ( भूमिका-बेकार बी. ए. )

( चाल—फटका )

( कै. रेंदाळकरांसारखे कित्येक कवि ' प्रेमासाठीं ', वेडे होतात. हल्लींच्या काळांत बेकार झालेला एखादा सुशिक्षित तरुण ' पैशासाठीं ' पिसाट बनून गेल्यांस आश्चर्य मानण्याचें कारण तें काय ? —आणि जगांत पैसा व प्रेम ( कनक आणि कांता ) यांचें वेड कोणांस नाहीं ? )

पैशासाठीं पिसाट झालों मिळेल कैसें पोटांला
उडुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी काम मला !
वणवण फिरलों गांवोगांवीं ' फर्म, ' ' ऑफिसें ' धुंडियलीं
' व्हेकन्सीच्या ' नकारघण्टें नष्ट सकल ही तनु झाली !
चक्कर नशिबाची फिरली
वृत्ती आनंदित सरली
नव्हतीं व्यसनें तीं जडलीं
शून्य सर्व हें जीवित भासे, कठिण वेळ मध्यान्हाला
उडुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी काम मला !

पोपटपंची शिक्षण सारें खर्चुनि पैसा ज्ञान खुळें
पदव्या मोठ्या लक्षाणिं खोटया, जीवाला नच ध्येय कळे !
विपरीता झाली सृष्टी
बेकारीची हो वृष्टी
सुशिक्षित ( ! ) मी बहु कष्टी
नाकरि बघतो, धंदा नडतो, वशिला कोठें नच भिडला
उडूनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी काम मला !

वय बहु झालें, लग्नहि दुर्लभ मिळे कोठुनी मज कांता ?
' घर–जांवई ' वा ' दत्तक ' कोणी घेइल त्या मी सिद्ध सदा !
मुग्ध-विरह परि हृदय चिरे !
पैशावरतीं विश्व फिरे
मिळेल तो मज कसा बरें ?
चैन पडेना, बघुनि पत्रिका, भविष्य, व्रत सांगा मजला
उडुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी काम मला !

आप्त सोयरे कोण कुणाचे ? मित्रहि शत्रू ते बनती
' शितेंच नसतां भुतें कोठलीं ? संकटकालीं मूढ मती !
पैसा करि अन्नान्न दशा
उडविल धनिकांचा फडशा
करील तो ती पूर्व दिशा
त्याच्यासाठीं भिक्षा मागूं ? अथवा बनुं कां चोर भला ?
उडुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी काम मला !

काय करावा उपाय सांगा, जीवहि द्यावा हाय गमे
विचार करुनी मस्तक फिरलें, परतंत्रीं जगणें न जमे !
देवाघरचा न्याय बघा
कुत्रें भरतें पोट न कां ?
मीच रहावा काय भुका !
हळहळ वाटे ' स्थिती न ऐशी येवो कधिंही कोणांला ' !
उडुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी काम मला !

****

# पहिली केस

अर्थात

Maternity Starts at Home !

( जाति–दिण्डी )



चार वर्षांचा ‘ कोर्स ’ असूनीया
दहा वर्षें लागलीं पास व्हाया !
शहर वस्तीचें प्रमुख जिथें ठाणें
‘ दवाखाना ’ थाटला ‘ डॉक्टरानें ’ !

दवाखान्याला जोडुनी तसेंच
स्थान देई तो प्रसूती–गृहास !
परीचारक ठेविला नोकरीला-
नर्स तैशी मिळण्यास योग आला !

कैक महिन्यांचा काल सरुनि गेला
कुणि न रोगी ढुंकला औषधाला !
‘ प्रसूतीला ’ लाभली स्त्री न कांहीं
मात्र दैना उडवून खर्च देई !

सर्व पैसा जवळचा सरुनि जाई
लग्न त्याचें जाहलें त्यांत नाहीं !
बहर आतां संपेल यौवनाचा
घ्यास म्हणुनी अंतरीं विवाहाचा !

नर्स सुंदर जी त्यांस लाभलेली
( बहिण होती जरि प्रथम मानलेली )
हाय ! केलें तिजवरी प्रेम त्यानें
नाहिं झाला पण बद्ध विवाहानें !

प्रेम–चाळे जरि असे चालवीले
बिंग त्याचें शेवटीं फुटुनि गेलें !
दिवस जातां लोटून ( तिला ) कांहीं
‘ केस ’ पहिली प्रसुतीस घरीं येई !

****

# मी आणि मिशा

( वृत्त–शा. विक्रीडित )

“ आईबाप तुझे जिवंत असतां तूं कां मिशा काढिशी ?
तूं रे मर्द तरी मुखावर कळा त्याची दिसेना कशी ?
तूं स्त्री नाहिंस, पौरुषत्व मग हें झांकून कां ठेविलें ” ?
देतों उत्तर त्यांस मी मज कुणी जे यापरी बोलले !

“ नाहीं ठेवित मी मिशा–नच असे मर्जी मनाची तर
श्मश्रूनें मज फायदा कितितरी हो कल्पनेबाहिर !
क्षेत्राहून सनातनी परतती क्षौरक्रिया होउन
क्षेत्राचें मज पुण्य तेंच मिळतें मी ना कुठें जाउन !

खायाला नच तूप तें मग वृथा लावी मिशांना कुणी
ऐसा पोकळ डामडौल करितों मी ना मिशा काढुनी !
घेतो पेय ‘ मिशाळ ’ तो निज मिशा हातें करूनी वर
तो ना त्रास मला कधीं पडतसे नाहीं मिशा तोंवर !

नाहीं पीळ भरावया मज मिशा एका प्रकारें बरें
घ्याया सूड कुणावरीं मम मनीं ‘ काळें ’ कधीं ना शिरे !
‘ मी देईन मिशी पहा उतरुनी ’ हा गर्व ना वाहिन
नाहीं ज्यांस मिशा, कधीं कुठूनि त्या जातील खालावुन !

वारंवार नव्या तऱ्हा चहुंकडे होती मिशांच्या अती
राखूं मीच कशा ? विचार पडुनी–कुंठीत होते मती !
'रागावून मिशावरी '–मज म्हणा–' मीं चाट त्यांना दिली '
वा ' त्यांना उतरावयास कवणा संधी न मीं ठेविली ' !

काढूनीच मिशा खरोखर सदा तारुण्य मी राखतों
येई वृद्धपणा-तरी वय किती ?—चोरून तें ठेवितों !
अन् जेव्हां सहचारिणी मज मुदें भेटावया येतसे
ओठांना नच होउनी अडथळा—घेतो मुके गोडसे " ! !

****

दा. क्र. १७०४२

## भ्रमर

( चाल–नृपममता )

बालकविः–" हा भ्रमर सदोदित दादा
उद्यानीं कसला धंदा । आचरी
गुणगुणुनी गाणें गाई
प्रति फुला–फुलावर जाई । क्षणभरी
सौगंध सेवुनी त्यांचा
सेवितो गोड मधु तैसा । कितितरी
जरि कळ्या फुलें त्या भावीं
प्रीतीची त्यांना लावी । माधुरी
यापरी । करुनि मैतरी । वंचना करी !
शेवटीं तोच—
आवडतो का न कुणांस । वद तरी ? "

बापः–" ठक कुणांस वद आवडला ?
वेडा तूं हो नच बाळा । त्यापरी
भुंग्यासम प्रेमळ गाणीं
करुं नकोस तूं देखूनी । 'सुंदरी' !
वर्णण्यास तीच्या लीला
काव्य–स्फूर्ति–पान्हा सगळा । आवरीं

पर्करी मुली अज्ञान
देउं तूं नको त्या ज्ञान । आसुरी
शाहिरी । काव्य–चातुरी । दाखवी खरी ।
द्यावया स्फूर्ती !
लाभेल तुला मग कीर्ती । कधिंतरी " !

गजाननाची मूर्ति घडवावयास जावें आणि 'माकड' व्हावें त्याचप्रमाणें सदरहू कविता ' गूढ–गुंजनात्मक ' लिहिण्याचा निर्धार केला असतांनाही ती ' मूढ–मुंडनात्मक' ( ! ) व्हावी यापेक्षां दुर्दैव तें कोणतें ? कै. गडकऱ्यांचें अंधानुकरण करणाऱ्या ' भगतांनो ' हा सुद्धां आचरटपणाचा मासलाच नव्हे का ?

****

# उंदराची मावशी

( जाति—फुलवेल )



काळ न वेळ— ही घूस पाडिते बीळ !
नवीन अमुचा वाडा सुंदर
स्वच्छ असे हा किती खरोखर
वसती त्यांत न जरी चिकार
परस्पर एक— राहते घूस बिनधोक

जुने पुराणे वाडे पडले
तिथें न जाणें तिज आवडलें
सत्तेपुढतीं कांहिं न चाले
व्यर्थ धुडगूस— वाड्यांत घालिते घूस !

बेपर्वा ही धरण्याविषयीं
बेपर्वा ही मरण्याविषयीं
भीति न शिवते तिला कधींही
कर्दनकाळ— फिरते ती सोडुनि बीळ !
ढेंकुण, पिसवा, मच्छर प्राणी
औषधास ना येथें कोणी
घूस एकटी प्लेगामधुनी—
उठवि कपाळ— वाड्यांत पाडुनी बीळ !

****

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23625 दि: 13/4
क्रमांक 9.7.72 नों: दि: 30/7/45

# पत्नी-प्रेम-विहार

( वृत्त—शा. विक्रीडित )



पत्नीच्या हृदयीं कसें वसतसे सत्प्रेम अव्याहत ?
त्याचें गूढ कुठें, कशांत भरलें, नाहीं मुळीं माहित !
नेत्रां तें न दिसे सदैव म्हणुनी कां आंधळें भासतें !
वेडें वा म्हणतांच कां उलट तें वेडावुनी टाकतें ?

'कामाला मजला उठीव सखये ! मोठ्या पहांटे तरी'
जेव्हां मी तिज सांगुनी पहुडतों रात्रीं सुशय्येवरीं !
साडेपांचहि वाजतात न कुठें बोले प्रिया स्पर्शुनी–
'नाथा ! झोंप पुरे–चहा पिउनि हा, घ्या स्नान आटोपुनी' !

पोरांचे करण्यांत कौतुक तसें पत्नीसवें गुंजन
जाते लोटुनि ती सकाळ सगळीं कामें तशी राहुन !
जेवाया मज घालुनी मग विडा देऊन ती बोलते—
'जा जा लौकर ऑफिसांत, तुमचें ना लक्ष गुंतो इथें' !

कामाच्या अगदीं ढिगांत बुडुनी जातां कचेरींत मी
सुट्टी होउनि स्वगृहीं परततां दारांत कांता उभी !
बोले–'वाट बघून मीच थकलें आतां करूं जेवण,
आहे सुंदरशी हवा वितरली येऊं चला हिंडुन' !

स्फूर्ती दाटुनि जेधवां लिहित मी एकांतिं काव्यें-कथा
येतें झोंप कुठून ? रात्र नकळे होते कितीशी तदा !
अर्धी रात्र सरे; म्हणे 'अजुनि हा कां नाद नाहीं पुरें ?
घ्या ना झोंप अतां तुम्हांस्तव किती जागून काढूं बरें ?

घेऊनी श्रम, काळजी मम करी दासी न ती, स्वामिनी
देई सौख्य मला अलौकिक खरें संसारयात्रेंतुनी !
प्रेमें मद्हृदयामधील अखिल प्रेमां तिनें जिंकलें
दिव्य प्रेम असें जगीं मिळत ना कोठें जरी धुंडलें ! !

[ केशवकुमारांच्या 'आजीच्या घड्याळ्यावर' हा 'पत्नी-प्रेम-विहार' तर चालला नाहीं ना ? ]

****

# पुणेरी पगडी

( जाति–बालमुकुंद )

[ कवि अज्ञातवासींचें ‘ माझें फूल ’ हुंगूनच ह्या ‘ पुणेरी पगडी ’चा स्वीकार करावा. ]

ही पगडि राहुं द्या डोक्यावरची अजून
कुणि उडवुं नका हो तिला ‘ पुणेरी ’ म्हणून !

केली न ‘वकीली’ पुण्यांत जरि राहुनी
वर्तमानपत्रीं घेतां तनु वाहुनी
बनलोंच पुढारी पगडी मी घालुनी
पण कुणी म्हणेना ‘दे. भ.’ खरा मज चुकून !

‘ गांधाळ[1]’ लोक ते खादीवेषामधें
तत्त्व तें तयांचें मला मुळीं नावडे
मम पगडीवरतीं सदा फोडुनी खडे
अर्पिती मला ते खादी टोपी ‘टिचून्[2]’ !

---

( १ ) भोजन भाऊंच्या साहित्य–पाकशाळेंतील पिठल्यांत अचानक सांपडलेला हा शब्दाचा गोळा ! ( २ ) प्रतिभासाधनाच्या धुमश्चक्रींत धुळवड उडविणारा Bomb-Shell.

निर्धार परंतू निश्चित माझा असे
मी पेशवाइच्या खुणेस राखीतसे
सामर्थ्य पगडिचें तुम्हांस सांगूं कसें ?
ती येइ फिरवितां—येतां संकट कुठून !


आहेर कितीही तुम्हीं मला अर्पिलें
ते जतन करूनी ठेविन मी चांगले
नच पगडी टाकिन तुमच्या हेक्यामुळें
मी मेल्यावरतीं जाळा तिज कुरतडून !

****

## पाय घसरला म्हणून—

(घराबाहेर, साष्टांग नमस्कार !)

(वृत्त–दिंडी)



काव्यगायन करण्यास परिषदेंत
कवी कोणी जाहला निमंत्रीत !
गळा सुस्वर नव्हताच जरी त्याला
नांव होण्या तो हपापून गेला !

निघायाची तो चालवी तयारी
नटायाची त्याजला हौस भारी !
स्वरुप सुंदर लाभे न मुळीं कांहीं
म्हणुनि दैवा तो दोष मनीं देई !

कृष्णवदनाचा रंग झांकण्याला
तयें लावियला दिखाऊ ‘ मसाला ’
केंस उलटें फिरवून भांग काढी
साफ त्यांतुनि घोटली आज दाढी !

परिट घाडिचा पोषाख उंच भारी
सजे घालुनि शाहीर तो पुणेरी !
बूट पायीं चढवूनिया नवीन
विडी फुंकित तो निघे घरांतून !

घराबाहिर पाऊल ठेविलें न
तोंच मार्गीं मार्जार ये दिसून !
चिडुनि त्याला तो कांहिं मारणार
घडुनि आला परि एक चमत्कार !

‘ बाड ’ हातांतिल जों न उगारीलें
तोंच मांजर त्याजला आड गेलें !
अशुभ घडतां थांबून तो न गेला
म्हणुनि त्याच्या ये काय प्रचीतीला ?

मांजरानें बैसून ‘ कळस ’ केला
त्याच जागेला घोर घात झाला !
पाय कविचा घसरून तेथ पार
त्यास घडला साष्टांग नमस्कार ! !

( अनुष्टुप् )


सत्य ही गोष्ट तूं रासिका ! असे ना अर्थ त्या जरी
मुलांना रेडियोंतूनी नको ती ऐकवूं परी !

****

# मावशीची आठवण

[ स्थळ—अन्नपूर्णा भोजनालय—प्रो० मावशीबाई ]

( वृत्त–पाण्डवः–गझल )



जेवण्या जों मावशी गे ! दार तूझें गांठलें
तोंड तूं जें चालवीलें मी दडूनी ऐकिलें !

सोवळ्यानें तूं चुलीशीं बैसुनी स्वैंपाकूघरीं
तूं उपाशी रागवीशी ऐन बारा वाजलें !

भाकरीचें पीठ थाळीं झर्झरा त्या थापुनी
फुंकुनीया फुंकणीनें इंधनां तूं निंदिलें !

तांबड्या रंगांत शोभे ' सोवळें ' अंगावरी
लाल झालेल्या मुखाला लाजावया नेसिलें ?

सोवळें तूझें पुराणें पाहुनीया वाटलें
' शंकराचार्यास ' येथें आज वा पाचारिलें ?

थांबलों ओशाळुनी अन् चोरुनी मी ये पुढें
नाद तों ये ' धप्प ' कानीं काय झालें पाहिलें ?

थापणें जोरांत चाले त्याच नादीं रंगलों
तोंडही ना ये धराया स्वैर तूं जें सोडिलें !

' थापतांना भाकरी तूं तोंड सोडावें खुलें
चोरुनी ऐकून मीही तृप्त व्हावें, '—वांछिलें !

तोंच येई श्वान तेथें! भाकरी ने ओढुनी
शूर तूं शासावया त्या शस्त्र तेव्हां शोधिलें !

मारण्यासी फेंकिली तूं ती चुकूनी फुंकणी
खोंक पाडी मात्र मातें खूण राही त्यामुळें !

****

# सोनेरी टोळी

( जाति–भूपतिवैभव )

ही मानवते मज जन्मापासुनि टोळी
लाविते चटक कीं जशी अफूची गोळी !
जंगली पशूंची झुंड जशी फिरणारी
ही तशीच टोळी गुंड इथें बेकारी !
ठांसुनी, ठसवुंनी, चोरुनि, योजुनि युक्ती
नाईक आमुचे खाद्य आम्हांला देती !
हे पोट भराया दीन कितीतरि भाऊ
श्रीमंत खरे जे–हात तयांना दाऊं !
येथेंच निंद्य कृत्यांचे – घ्या धडे
मग कैदकाम करण्याला – व्हा खडे
गाजवा नांव टोळीचें – चहुंकडे
मग लोक गर्जतिल दुष्ट दुष्ट ती टोळी
जी पोटासाठीं चेतुनि देते होळी !

[ आचार्य अत्रे यांची ‘ माझी शाळा ’ आणि तेथें शिकत असतांनाच त्यांच्या कवितेवर ही ‘ सोनेरी टोळी ’ तयार झाली. उमाजी नाईक, तंट्या भिल्ल, बच्चा-इ-साकू हे जर आज हयात असते तर त्यांना ही कविता प्रार्थनेप्रमाणें वाटून मुलांच्या क्रमिक पुस्तकांत घेण्यासाठीं त्यांनीं ह्या कवितेची खास शिफारस केली असती ! पण त्याचें आतां काय ? नाहीं तो ‘ चान्स ’ आमच्या नशिबीं ! ]

****

# बेपत्ता कंत्राट्दार

( जाति–शुभवदना )


तिकिटांच्या विक्रीचा लांबवुनी गल्ला
कंत्राट्दार कोठें तो बेपत्ता झाला ?
वर्तमानपत्रांतुन जाहिरात करुनी
नाटक ' मानापमान ' गेलें झळकूनी !
आमंत्रण ' तारेनें ' मिळतां ' कामाचें '
कलावंत धावुनिया आले ' नाइटचे ' !
थिएटरवर गर्दीचा तोबा हो उडला
नाटक तें होउनि सुरु रंग भला भरला !
' धैर्यधराच्या ' पदांस ' वन्समोर ' झाले
' भामिनि'चा गोड गळा,–जन त्यानें धालें !
अभिनयांत ' लक्ष्मीधर ' मौज करी भारी
नाटक तें सुटलें तों रात्र सरे सारी !
घामाघुम कामानें नट जो तो झाला
हाय ! परी कंत्राट्दार कोठें तो गेला ?
पुटपुटला थिएटरचा मालक तितुक्यांत
कंत्राट्दार जातांना दिसला मोटरिंत !
' देईन उद्यां थिएटरचें उरलेलें भाडें '
बोलुनिया हो पसार थांबतां न थोडें !
गेला तो विक्रीचा बळकावुनि गल्ला
कलावंत ! पळ काढा गरजत " या अल्ला ! ! "

****

# जाहीर सभा

[ शहरांत सभा भरविणाऱ्या एका चालकाचें मनोगीत ]

( चाल—झाल्या तिन्ही सांजा )



अजुनि कसे येती ना नागो, नरसोबा ?
वेळ सरे, होइल कां नाहीं आज सभा ?

उशिर होइ जमुनीया लोकांचा मेळा
गोपिनाथ, गंगाधर झुलती कामाला
वसविति ते लोक जरी माजतसे तोबा
वेळ सरे, होइल कां नाहीं आज सभा ?

जागा ती भव्य कुठें नेमुनि जी दिधली
विषय छान ऐकतांच गर्दी बहु झाली !
शिस्तीचा कोणावर नुरला मग ताबा
वेळ सरे, होइल कां नाहीं आज सभा ?

हंसविणार कादरखां भाषण तें करुनी
रसिकांना रिझवाया बिजली ये सजुनी !
बोलण्यास इतरां जरि होती आज मुभा
वेळ सरे, होइल कां नाहीं आज सभा ?

ओसरल्यावर गर्दी मौज न ती कसली
अधिपति पण जोडी कां अन्य सभेंत रमली ?
दारावर वाट बघत कुठवर राहुं उभा ?
वेळ सरे, होइल कां नाहीं आज सभा ?

पुटपुटला तो मिशाळ अशुभ इथें कसलें ?
अंत्यविधीस्तव दोघे जातांना दिसले !
राख अतां तूंच लाज माझी जगदंबा
वेळ सरे, होइल कां नाहीं आज सभा ?

## जाहीर सभेंतील पात्रें:—

नागो—स्वागताध्यक्ष
नरसोबा—अध्यक्ष
गोपिनाथ, गंगाधर—व्यवस्थापकांची जोडगोळी
कादरखां—मुख्य वक्ता
कु. बिजली—काव्यगायिका
मिशाळ—एक मास्तर
जगदंबा—संकट निवारणारी देवी !

****

# मास्तरं आणि मुलें

( वृत्त-शा. विक्रीडित )

वेडा तो दिसला सुशिक्षित कुणी बेकार होऊनिया
वर्षें कैकहि जाहलीं तरि मिळे ना कामधंदा तया !
छोट्या त्या शहरामधें रखडुनी तो आक्रमी जीवित
गांवांतील मुलें उनाड सगळीं होतीं मजा मारित !

दंगेखोर मुलें जमूनि वदलीं वेड्यांस तीं एकदां–
'वेडा माणुस तूं ! अरे न अगदीं कांहीं तुझा फायदा'!
रागावून तयांस तोच वदला–'कां ही मला टोंचणी ?
सारा हूडपणा तुम्हांस तुमचा जाचेल मोठेपणीं'!

वेड्याच्या परि अंतरांत भिनले ते शब्द वीषासम
रात्रंदीस उपास त्यांत घडुनी तो जाहला निष्प्रभ !
पोरांच्या मनिं–मानसीं न ठसलें तें वेडप्याचें वच
त्यांचा हूडपणा थरांस भिडुनी थांबे न तो कांहिंच !

गांवीं त्याच तदा धनाढ्य न कळे येई कुठूनी कुणी
पोरें तेथ बघून, छान सुचली युक्ती तयाच्या मनीं !
पैसा खर्चुनिया इमारत तयें शाळेप्रती बांधली
वेडा मास्तर तो तिथें कशितरी त्या नोकरी लागली !

आपोआप तिथें कुणी ‘ मिशनरी ’ येई प्रचारास्तव
शाळा ती बघतांच त्यांस फुटला आनंददायी द्रव !
गांवांतील मुलें तयें भुलवुनी शाळेमधें आणलीं
हर्षा पावुनि तीं कधीं न चुकतां येऊं तिथें लागलीं !

शाळा ती नयनां अतां दिसतसे गांवांत उत्कर्षत
वेडा मास्तर तो मुलांवर ठरे आचार्य नामांकित !

[ केशवकुमारांची ‘ फत्तर आणि फुलें ’ पाहून त्यांवर ह्या ‘ मास्तर आणि मुलें ’ ह्यांनीं हल्ला तर केला नाहीं नां ? ]

****

# भविष्य माझें सांगायाला—

( जाति–केशवकरणी )



भविष्य माझें सांगायाला जोशी कुणि भेटला
कुडमुडा जोशी कुणि भेटला !

" हें दैव शिकंदर तुमचें सर्वांहुन
येतील लौकरी सोन्याचे ते दिन
होईल मुलाचा लाभ बरें त्यांतुन !
नोकरींत ती होऊन बढती मिळेल पैसा भला ! "
—असे तो जोशी मज बोलला !

हांसलों मनाशी त्याचें वच ऐकुनी
अन् शांतपणानें वदलों त्यालागुनी—
" समजलास जोशी ! काय मला रे मनीं ?
पोटासाठीं बकबक वेड्या ! चालविली जरि किती
व्हायची निष्फळ ती शेवटीं !


मी भाग्यवान् तो प्राणी नाहीं बरें,
बेकार होउनी रस्तोरस्तीं फिरे,
मज पोटासाठीं मिळत न कांहीं पुरें
प्लेगामध्यें नुकती गेली प्रिया मला सोडुनी
व्हायचा मुलगा मग कोठुनी ? "

हें उत्तर माझें सडेतोड ऐकुन
तत्काळ मनीं तो सर्द पुरा होउन
अन् तोंडामध्यें घे अपुल्या मारुन
" क्षमा करा मज "—बोलुनि कोठें दृष्टिआड जाहला
गमे त्या—" ठकास ठक भेटला ! "

****

# पुराणिकबुवा !

( जाति–सूर्यकांत )



मंदिर गांठुन चौरंगावर पुराण हा सांगतो
रोज रोज मग थवा स्त्रियांचा हळूहळू वाढतो !

स्कंध महाभारतामधिल ते संस्कृतांत वाचतो
स्पष्टपणें प्राकृतांत त्यांवर टीकामृत पाजतो !

निवेदतांना प्रणयरसाच्या कथा स्वता रंगतो
पिकल्या पानामधील हिरवा रंग जणूं दावितो !

मधेंच येतां मात्र खोकला चष्मा संभाळतो
नवीन सुंदर ' पात्रें ' दिसतां अचूक त्यां हेरतो !

आजीबाईजवळ तियेची तपकिर हा ओढतो
शिंक देउनी निद्रित बाया ताळ्यावर आणतो !

कोरड पडतां कधीं घशाला खाडिसाखर सेवितो
तांदुळ जमले कितीक पुढती बगळ्यासम पाहतो !

दिवस संपतां करुनि समाप्ती पोथी गुंडाळतो
अल्प बिदागी दिसतां पुढती मनांत संतापतो !

समजुन ' चोराची ती लुंगी ' खांकेला मारतो
' शिधापद्धति 'स शाप देउनी घराकडे चालतो !

घरास जातां शालजोडितुन अहेर कुणि अर्पितो—
" पुराणांतली वांगी आम्ही पुराणांत ठेवितों ! ! "

****

# पुराणिकबुवा !

( जाति– सूर्यकांत )



मंदिर गांठुन चौरंगावर पुराण हा सांगतो
रोज रोज मग थवा स्त्रियांचा हळूहळू वाढतो !

स्कंध महाभारतामधिल ते संस्कृतांत वाचतो
स्पष्टपणें प्राकृतांत त्यांवर टीकामृत पाजतो !

निवेदतांना प्रणयरसाच्या कथा स्वता रंगतो
पिकल्या पानामधील हिरवा रंग जणूं दावितो !

मधेंच येतां मात्र खोकला चष्मा संभाळतो
नवीन सुंदर ‘ पात्रें ’ दिसतां अचूक त्यां हेरतो !

आजीबाईजवळ तियेची तपकिर हा ओढतो
शिंक देउनी निद्रित बाया ताळ्यावर आणतो !

कोरड पडतां कधीं घशाला खडिसाखर सेवितो
तांदुळ जमले कितीक पुढती बगळ्यासम पाहतो !

दिवस संपतां करुनि समाप्ती पोथी गुंडाळतो
अल्प बिदागी दिसतां पुढती मनांत संतापतो !

समजुन ‘ चोराची ती लुंगी ’ खांकेला मारतो
‘ शिधापद्धति ’स शाप देउनी घराकडे चालतो !

घरास जातां शालजोडितुन अहेर कुणि अर्पितो—
“ पुराणांतली वांगी आम्ही पुराणांत ठेवितों ! ! ”

****

# क्लबाकडील गोष्टी

( वृत्त—वसंततिलका )

[ उनाडटप्पू लोकांचा हा ‘ नाट्यक्लब ’ सध्यां मोडकळीस आल्या-कारणानें त्याचें पुनर्जीवन केव्हां होईल हें सांगणें कठीण आहे ! केशवसुत, तुम्ही मात्र क्षमा करा ! ]

गोष्टी क्लबाकडिल मी वदतां गड्या रे
हासूं नकोस पण ऐकुन घेइं सारें !
वस्तू तुला सकल ज्या दिसतील तेथें
व्यक्तीपरी असति भूषण त्या क्लबातें !

ही देख पेठ ‘ बुधवार ’ पुण्यामधलि
गर्दी अहर्निश जिथें असते कमाल !
‘ भांग्या ’ विदीत ‘ बजरंग ’ अहा तिथून
प्रख्यात बोळ दिसतो चल त्यामधून !

गल्लीमधून शिरतां वर डुंकशील
मोठा उजेड तुज रात्रिस तो दिसेल !
मित्रा ! हळूच जपुनी पद टाक तूं रे
मौजा पहा न कळतां रमणींचिया रे !

आवाज ‘ किर्र् ’ रजनी जरि बोलताहे
‘ शुक् शुक् ’ असा ध्वनि इथें पण चालताहे !
माडीवरी बघ कुठें नव रंगढंग
गाण्यास त्यांतुनि चढे भलताच रंग !

ह्या सातआठ त्यजुनी पहिल्या घरांतें
माडीवरी ' क्लब ' पुढें चल आंत तेथें !
माडीस ह्या बघ जिना झुलता, अरुंद
कीं चालतां करकरां करतो निनाद !

खोलीस दार बघ हें बुटकें, पुराणें
वांकून आंत हलके जपुनीच येणें !
खोलीमधें जरि दिवा जळतो विजेचा
वाऱ्याविना गुदमरे जिव माणसाचा !

मित्रा ! चहूंकडुन विस्कटली पथारी
ताटांतली ' उडुनि ' पान तशी सुपारी !
पाऊस येथ पडला जळक्या विडयांचा
भिंतीस रंग चढला बघ लाल कैसा ?

वाद्यें मुकीं सकल तीं दिसती पडून
पेट्या तशा पसरल्या कपडे कुजून !
तालीम चालुन इथें नव नाटकाची
' पात्रें ' दमून निजलीं सकळीं क्लबाचीं !

निद्रिस्त घोरत पडे बघ जो विशाल
वेडा, विदूषक तया म्हणती टवाळ !
त्या मास्तरां कुठुन मी प्रिय शिष्य शोभे ?
लोकांत तो जरि म्हणे मज शिष्य लाभे !

ह्या मास्तरांस बघुनी मज कींव येते
आहे चलाख पण कांहिं न चीज होतें !
नाट्यें तशा पटकथा लिहितो सदैव
पैसा न कीर्ति पण देइ तयास दैव !

त्या मास्तरापलिकडे बघ लोळणारा
गोटया ! लहान मम बंधु सतेज ‘ तारा ’ !
तो नृत्य-गान शिकुनीच तयार होतां
त्याच्यामुळें मजासि लाभ मिळेल मोठा !

गोट्या ! गड्या ! नट खरा बनशील काय ?
तूं रंगभूमिवरती तगशील काय ?
गोटया ! जनांस तव गान रुचेल काय ?
‘ गंधर्व ’ नांव तुज सांग मिळेल काय ?

चोरापरी हळुच टाकित पाय पाय
मित्रा ! बघूं पलिकडे दिसतेंच काय ?
खोलीस ह्या पण दुज्या न दिसे प्रवेश
आंतील तें मग कळेल कसें विशेष ?

दाराचिया बघ फटींतुन हात जातो
आंतलि काढुनि कडी हलकेंच घेतों !
ये ये पुढें भिउं नको अगदींच मित्रा
चावेल ना जरि दिसे तुज येथ कुत्रा !

मित्रा ! अचानक इथें मज ये शिसारी
येथें हवा नसुन वास भरे विकारी !
दुर्गंध नाहिं कधिं ‘ नागझरी’स ऐसा
वाटेवरी ‘ मटन–मार्केट’च्या न तैसा !

मित्रा ! असा हळुच डाविकडून येई
खोली इथें बघ प्रशस्त न त्याहुनी ही !
‘ पात्रें ’ स्त्रिया अहह ! या स्थलिं झोंपतांना—
पाहून, हाय ! कणवा नच येइ कोणा ?

तो मोडका बघ पलंग तिथें निजे ती
' खड्कीकरीण बिजली ' दिसण्यांत साधी !
कन्या तिची जवळ ती अगदींच काळी
लाभे क्लबास बघ ' माल ' असा कपाळीं !

निद्रिस्त येथ दुसऱ्या बघ ह्या मुली तूं
कीं ' भावबंधन'मधीलच इन्दु–बिन्दू !
ती कोण दूर रडते ?–निजली असूनी—
अश्रू कशास्तव तिच्या नयनीं गळूनी ?

भावी असे मम वधू बघ तीच नामी
( गोव्याहुनी तिजसि जाउनि आणिली मी ! )
' वेडे ! उगी; रडुं नको ! पुरवीन कोड
स्वर्गीय सौख्य तुज देइन गोड गोड ' !


मागील दार बघ हें इथुनीच जाऊं
' हॉटेल ' तें जवळ ' गोल्डन टी'च घेऊं !
तेथें गड्या ' बिल ' हवें तुज द्यावयाला
जाऊं तुझ्या मग घरीं–लकडी पुलाला !!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्वामित्व.
अनुक्रम ........ वि. ........
क्रमांक ........ नों. दि. ........

# बर्नेट् मारकस्

( जाति–कोकिळा )

( बर्नेट् मारकस् हा कुणी साहेब नाहीं ! खडकीच्या मिलिटरी डेअरी फार्ममधील तो एक प्रख्यात् ' वळू ' असून त्याला पाहिल्यावर कवीस ' मस्त ' स्फूर्ति येऊन ही कविता बाहेर पडली! जिते रहो जिवा ! )



धन्य वळू हा खास !
अफाट रानें अंवतीं भंवतीं
काळी काळी सगळी माती
सुंदर त्यावर नटली शेती
प्रशान्त जागीं वृक्षासन्निध ह्याचा नित्य निवास !

छप्पर पत्र्याचें तें वरती
हवी तशी ती जागा पुढती
कुंपण कांटेरी त्याभंवतीं
बंदीमध्यें जीवन ह्याचें नाहीं मात्र उदास !

निसर्ग देई सदैव थारा
भिरभिर वाहे संतत वारा
प्रखर उन्हाचा नाहीं मारा
सुंदर वातावरणीं ह्याचा होतो देहविकास !

मनाप्रमाणें खाया मिळतें
कमी न कांहीं कसलें पडतें
बादशहासम जीवन गमतें
गडी माणसें झुलती ह्याला कसला ना वनवास !

हत्तीलाही लाजविणारी
शरीरयष्टी कणखर भारी
अचाट अंगीं शक्ती सारी
टक्कर देउन कोणाचाही करील सत्यानास !

आफ्रिकेंत हा जन्म पावला
कोणी येथें त्यास आणला ?
परदेशी हा कायम झाला
जन्मभूमिचा मनांत ठेवी जिवंत पण इतिहास !

कर्तव्याला कधीं न चुकतो
प्रजोत्पादन उत्तम करतो
त्यास्तव जीवन अपुलें म्हणतो
कलेस माझ्या जोड न कोठें सांगे हा सकलांस !

( बर्नेद् मारकस्—जन्म-दक्षिण आफ्रिका ता. १२।५।४१ )

****

# मी आणि मामा

( वृत्त–वसंत )



घरीं तो सोडमुंजीचा निघाला सोहळा माझा
बघाया आप्तही आले स्वधर्मातील त्या मौजा !

बटू तो ब्रह्मचारी मी निघे जों काशियात्रेला
अहा ! धांवूनिया मामा मला ये थांबवायाला !

वदे–' रागावुनी ऐसा नको काशीस रे जाऊं
तुला देईन मी कन्या कशी माघार घे पाहूं ! '

' बरें ! ' बोलूनियां तेंव्हां घरा ये आमुची ' स्वारी '
मनीं ते शब्द मामांचे परंतू बिंबले भारी !

पहा गोष्टीस त्या आतां पुरेसा लोटला काळ
वयें मी वाढुनी, पेटे जिव्हारीं प्रीतिचा जाळ !

कराया मागणी गेलों मुलीची ख़ास मामांना
स्मृती मागील शब्दांची करूनी मीं दिली त्यांना !

विडी फुंकूनिया मामा म्हणाले–' थाप ती होती !
धुराचे लोट हे जैसे फुका तें शब्द मी काढी ! '

धुराचे लोट पाहूनी तसे ते जाणुनी शब्द
कपाळा हात मारूनी अरेरे ! जाहलों सर्द !!

****

# बुरखेवाला

( जाति—मनमोहन )

[ ' आलमगीर, " द्रोणाचार्य, "' वायुपुत्र, ' ' विभावरी शिरूरकर, ' 'गतभर्तृका', 'कृष्णद्वैपायन ' वगैरे बुरखेवाल्यांच्या टोळींत प्रस्तुत कवीचा कोणी शोध घेऊं नये. ]

त्या टोपणनांवाखालीं करसी टीका कां चोरून ?
प्रगटुनीया नांव सारें
तूं झणीं बाहेर ये रे
ये जेंवि मल्ल तो फडामधूनी दंड स्वतः ठोकून !
नांवरूपा यावयातें
बहकशी ना नित्य खोटें ?
सज्जनांपरी तो स्वार्थी ढोंगी राहिल काय टिकून ?
घेउनी साहित्य परके
मारितोसी व्यर्थ फटके
आयत्या बिळांवर नागोबाचें जाइ खरें फावून !
अंतरंगीं द्वेष भिनला
व्यर्थ जरि तो माजवीला
कां काकश्रापें पवित्र धेनू जातिल सर्व मरून ?
नित्य घेशी भिन्न नांवें
कळानि कोणा कीं न यावें
परि बिंग खरें तें कधींतरी ना जातें पार फुटून ?

हंस पक्षी मूक प्राणी
दूध घेती जल त्यजूनी
निर्दयी मनुज तूं दोषां धारिसी गूण मात्र सोडून !
राहुं दे आस्तित्व तूझें
वचन परि हें जाण साचें—
' भुंकलें श्वान तें तरी न पाहे गज त्याला ढुंकून ! '

****

# ‘ लाल ’ बावटेवाले !

( जाति–चंद्रकांत )



‘ लाल बावटा ’ रस्त्यामध्यें दिसे फडकलेला
हळूहळू त्याभंवतीं दिसला लोकांचा मेळा !

‘ कम्यूनिस्ट ’ ते सारे भाई होउन बेभान
क्रांतीवरती देतिल आतां जहाल व्याख्यान !

विचार केला भाषण त्यांचें ऐकाया जावें
पटले नाहीं विचार तर ते सोडुनिया द्यावें !

आतुरतेनें म्हणून गेलों तेथें मी जेव्हां
हाय ! निराळें दिसून आलें दृश्य मला तेव्हां !

' कम्यूनिस्ट ते क्रांतीकारक व्याख्याते कसले ?
साफसूफ ' ड्रेनेज ' कराया कामकरी जमले !

' डेंजर सिग्नल ' लाल बावटा त्यांचा तो बघुनी,
दुर्गंधीचा वास आणखी लावी मज पळुनी !!

****

# नापिकदादा !

( जाति—केशवकरणी )



खुंटावरती वडाखालती बसुनी हा नापिक
न्यहाळी अदबीनें ग्राहक !
लालभडक गरगरीत बांधी पागोटें तें जुनें
शिपाई संस्थानिक कीं बने !
धोतर मळकें वर करगोटा कुडता अंगावर
चालतो काढुनि छाती वर !

रुपयाइतुके गंध कपाळीं चमकदार लाविलें
कपोलीं कल्लेही ठेविलें !
चालत जातां करकर वाजे जोडा पायामधें
नाचते बाळी कानामधें !
वकिलाहातीं जशी ' बॅग ' ती तैशी हा खाकुटीं
ठेवितो चमड्याची धोपटी।
धंदा नसतां पान खाउनी तोंड किती रंगतें
सारखा बघे आरशामधें !
गिऱ्हाइकांच्या पायतणांना चर्मकार हेरतो
तसा हा मुखड्यांना पाहतो !
खूण करूनी हाक मारता देवदूत हा कुणी
येतसे लगबगिनें धांवुनी !
मधेंच कोणी आडवितांना वदे तया " व्हा पुढें
लौकरी येतो तुमच्याकडे ! "
चटपट करुनी काम चालवी कारागिर हा भला
कला ही जीवन दे त्याजला !
करमणुकीस्तव कामामध्यें भाषण हा झोडतो
खरोखर वक्ता जणुं भासतो !
गप्पागोष्टी इतिहासांतिल तिखटमीठ लावुनी
सांगतो संशोधक हा कुणी !
राजकारणावरती चालू कठोर टीका करी
भासतो मुत्सद्दी का तरी !
' सपाट गोटा ' करावयाला पटाईत हा सदा
हाय ! पण ग्राहक रडतो तदा !
' मालिशचंपी ' करतांना पण जीव किती हा रमे
सारखें चोळुन घ्यावें गमे !

‘ बडे जेवढें मान तयांची माझ्या हातामधें ’
—सांगतो पठ्ठ्या ऐटीमधें !
जावळ, मुंजी निघोत तेव्हां हटकुन ये सत्वर
आणितो वाजंत्रीही वर !
असेल ज्याच्या अंगीं मस्ती कुस्ती हा खेळिल
फडामधिं बक्षिस पण जिंकिल ! !

****

## बाथरूम–सिंगर !

( वृत्त–पाण्डव गज्जल )

बैसुनी स्नानगृहीं ह्या कोण गाते सुंदरी
गान तीचें ऐकतांना मोहिनी वाटे खरी !

गोड गाण्याची लकेरी लाजवीते कोकिला
अप्सरा स्वर्गांतुनी ये दाखवाया चातुरी !

का कलावंतीण कोणी गोड ताना मारते
निर्झराचें संथ पाणी गातसे तालावरी ?

गुंजते कुंजांत किंवा भृंगराणी एकटी
आपुल्याशीं गान गाते कीं किशोरी लाजरी ?

गोड गाणें दिव्य भासे जीव हा वेडावला
गायिका ती पाहण्याला ध्यास लागे अंतरीं !

दार झालें मोकळें जों ( घात मोठा जाहला ! )
हाय ! मोलारीण येई घासुनी भांडी परी !

रुक्ष तीच्या दर्शनानें मी जरी ओशाळलों
हो सिनेवृत्ती मनाची तेधवां जागी पुरी !

पार्श्वसंगीतें म्हणाया ही जरी कामास ये
वेड ही लावील लोकां ना नटी झाली तरी !

****

# फोटोग्राफर तो—

( वृत्त–शा. विक्रीडित )



फोटोग्राफर तो नवोदित कुणी होता बरें एकला
त्याचें लग्न न जाहले अजुनहा ' भाई 'परी राहिला !
' कॅमेरा ' करिं घेउनी फिरतसे वेड्यापरी सारखा
दृष्टीला रमणीय दृश्य दिसतां घे ' स्नॅप ' तो नेमका !

फोटो मासिक-पत्रकांस वशिला लावूनिया धाडितो
प्रेमाच्या कविता निरर्थक तशा छापूनही आणितो !

कीर्ती आणिक संपदा मिळविण्या अत्यंत लोभावला
दोघींनीं पण त्याजला अजुनही ना थांग लागूं दिला !

त्याच्या दृष्टिस एकदां पडुन ये मार्गांत बाला कुणी
होती सुंदर, कोमलांग, हंसरी ( सांगूं किती वर्णुनी ? )
बेमालूम तिचा तिला चुकवुनी फोटो तयें काढिला
' बाला मिस्किल ' नांव देउन वरी तो मासिकीं छापिला !

घेऊनी परवानगी नच; बळें फोटो असा छापिला
बालेनें बघुनी मुकाट अपुल्या तो संग्रहीं ठेविला !
फोटोग्राफर हेरुनी मग तिनें त्या हातही दाविला
त्याचें ' जीवनचित्र ' ती चितरतां घायाळ तो जाहला ! !

****

# पुण्याचे भामटे आम्ही !

( वृत्त—वसन्त )

मवाली मुंबईचे ते नि सोदे दिल्लिचे नामी
जनीं प्रख्यात हो तैसे पुण्याचे भामटे आम्ही !

महाराष्ट्रामधें मोठें पुणें हें केंद्र विद्येचें
निवासी तेथले सारे अडाणी कोठुनी आम्ही ?

स्वतःला मानि जो तो कीं, ख़रा मी शाहणा मोठा
कधींही एकमेकांचें न देतों तें पटूं आम्ही !

अहा त्या 'सभ्य' नांवानें सदा ऐटींत वागून
बिचाऱ्या दीन लोकांना लुटूनी गांजतो आम्ही !

किती त्या आमुच्या लीला तुम्हां वर्णून सांगाव्या ?
न त्यांवाचून कोणाला कळायाचे खरे आम्ही !

इथें गांवामधें साऱ्या विरोधी नांदती पक्ष
टवाळी एकमेकांची कराया शूर ते आम्ही !

जरी राष्ट्रामधें आलें घडूनी ऐक्य सर्वत्र
कराया त्यांवरी टीका निराळे राहतों आम्ही !

पुढारी अन्यपक्षाचा कुठें गांवामधें आला
जिवाला त्याचिया धोका प्रसंगीं आणितों आम्ही !

समाजाला सुधाराया खरा जो कष्टला पूर्वी
जिता तो,–प्रेतयात्राही तयाची काढली आम्ही !

सभा राष्ट्रीय ती मोठी जहाली एकदां जेव्हां
अहा रंगामधें ‘ जोडा पुणेरी ’ फेंकिला आम्ही !

कधीं बाहेरुनी येथें नवा वक्ता कुणी आला
निघे जो नेभळा त्याला पुरा फेटाळतो आम्ही !

कवी काखोटिला बाडें कितीही मारुनी आले
कुठें गद्यांत ते गातां न देतो दाद त्यां आम्ही !

कितीही जाहिरातीनें कुणी तीं नाटकें केलीं
जरा ‘ बेरंग ’ पाहूनी भजी त्यां मारतों आम्ही !

लिहाया लागला कोणी कुठें थोडेंहि अश्लील
बहिष्कारून त्यां शिक्षा कधीं ठोठावतों आम्ही !

कुणी अस्पृश्यता जाया किती केले जरी यत्न
पुरूनी राहतों त्याला पुराणी सोवळे आम्ही !

कराया भाषणें मोठीं दणाणे आमुची वाणी
कृतीची वेळ येतांना मुकस्तंभापरी आम्ही !

समाजाला सुधाराया पुढारी होउनी कट्टे
कसा तो स्वार्थ साधावा पुरें हें जाणतों आम्ही !

कुणांला घालण्या टोपी, कुणाला पाडण्या खालीं
अनुल्लेखून माराया कुणां, निष्णात ते आम्ही !

जसा वाहील तो वारा मतें निर्माण तीं होतीं
निमालें ध्येय तत्रापी खरे मुत्सद्दि ते आम्ही !

पुण्याला ठेवुनी नांवें वृथा मारलि जो थापा
तयाला चोंच माराया खरे ते कावळे आम्ही !

‘ कधींही आमुच्या नादीं बळें लागूं नये कोणी ’
इषारा हा कसा द्यावा अरेरे शेवटीं आम्ही !

मवाली मुंबईचे ते नि सोदे दिल्लिचे नामी
जनीं प्रख्यात हो तैसे पुण्याचे भामटे आम्ही !

( भामटे म्ह० ‘ बनलेले ’ असाच अर्थ करावा. कवि हा सुद्धां पुण्याचाच आहे याची मात्र रसिकांनीं याद राखावी. )

****

# चोर, साहित्यसेवक आणि मिशा !

( जाति–मोहिनी )

घोर रात्र बघुनी माझ्या येउनी घरास
दागिने प्रियेचे चोरा काय चोरलेस ?
कसे दिवस कंठी मी हें एक देव जाणें
प्रिया त्यांत श्रीमंताची मिळे नशीबानें
विवाहांत तिचिया दिधले दागिने पित्यानें—
हिरावून कां मम जीवा फास लाविलास ?
नेमका कसा तूं येशी माझिया घराला
विश्व ओस पडलें होतें काय लुटायाला ?
' चोर जाणतो चोरा '–हें तत्त्व पटविण्याला—
' लेखनांत करि मी चोरी '–म्हणुनि गांठलेंस ?
स्त्रीधनाविना ना तुजला अन्य सांपडावें ?
मिराविण्या सखीनें आतां सांग कसें जावें ?
हाय ! दागिने मीं तैसे कोठुनी करावें ?
कडाडेल वीज तिची मी साहुं कसा त्रास ?
शूर कां असूनी नेशी दागिने सखीचे
जाड आंकडे तुज दिसले का न मन्मिशीचे ?
मिशा पार नेतां, वदते सनातनी वाचे–
' आइबाप गेले म्हणुनी सुतक मला खास ' !

****

# दोन बायकांचा दादला !

( जाति–शुभवदना )



दुर्बुद्धी देवा मज झाली सांग कुठून
स्त्री पहिली तरि दुसरी केली मी जाणून !

कडकडुनी भांडतात दोघीजणि भारी
लाजुनि त्यां मांजरेंहि पळती पार दुरी !
ती हिजला ही तिजला पाण्यामधिं पाही
पूर्वजन्मि एकमेक वैरी जणुं कांहीं
जर्जर मज दोघींनीं केलें फार छळून
हाडांचा सांगाडा गेला देह बनून !

तुलना ह्या दोघींचीं करतां मति थकते
एक ‘ त्राटिका ’, दुसरी ‘ गजघंटा ’ गमते !
काळी ही शूर्पणखा, गौर करंटी ती
दोघींच्या खर्चाला ताळ नसे अगदीं !
चैनीस्तव संपत्ती घेती रोज लुटून
मालक मी असुनी मम देती नच चालून !

श्रीमंती असुनी मज सौख्य न तें कसलें
बुद्धीची भूक कशी शमवावी न कळे !
वारस मज पुत्र नसे दोघींच्याकडुनी
‘ अगतिक ’ मी होई पुरा, सार्थक ना जगुनी !
दोघींची जिरवाया दत्तक तो घेऊन
संन्यासी होउन मी जातों घर सोडून !

****

## बघावयास आलों, पण–

( जाति–मंजरी )

तुज ' बघावयाला ' आलों जेव्हां घरीं
शृंगार किती तूं नटुनी केला तरी !
' स्नो ' तशी ' सफेती ' मुखास तूं लाविली
अन् चकणी दृष्टी चष्म्यानें झांकली !

घर भाडोत्री तव देह स्थिती सांगुनी
नच प्राप्ती येथें अन्य, मुलीवाचुनी !
तव ' गरिबी ' असुनी अंगावर ह्या क्षणीं
घातले दागिने कोणाचे मागुनी ?

भोंगळी इर्कली साडी जी नेसली
कां आजीच्या ती होतीं लग्नांतली ?
आखूड जहाले केस अकालीं गळून्
शेपूट जोडलें गंगावन कां म्हणून् ?

वाचून घेतलें कुठें ' मराठी ' जरा
तव जिभलीची मज दिसली न्यारी तऱ्हा !
ती ' सदर्न्–मराठा ' रखडे मार्गी जशी
अडखळे तोतरी वाचा तव गे तशी !

'तुज काय काय तें सांग येतसें बरें ?
हा प्रश्न टाकतां भरलें तुज कांपरें !
जिव झाला तूझा क्षणांत घामाघुम
'मज येते सारें'--वदतां लागे दम !

अन् चहा शेवटीं आंतुनि तूं आणिला
लंगडा पाय तों चुकून दिसला मला !
साखरेविना तव चहा बळें ढोसुनी
निःश्वास सोडिला ! निघतांना तेथुनी !


[ह्या कवितेची दुसरी बाजू मांडण्याकरितां कोण्या 'कवियित्रीनें' मनावर घेतलें तरी कवीचें मन मोडणार नाहीं हें आधींच सांगून ठेवलेलें बरें !]

****

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23... दि: ...
क्रमांक ... नों. दि: 3...

# बेफाम बकरा !

( जाति–शुभवदना )



बेफाम किती माजुनिया गेला हा बकरा
रस्त्यांतुनि जाइल हा देत बळें टकरा !

रात्रंदिन पोळासम भटकुनिया स्वैर
पोट भरीं बाहिर हा वागुनिया गैर !
चिंता नच मालकांस ह्याची ती कसली
गमतें त्यां ब्याद बरी बाहेरीं टळली !

त्रास किती लोकांना देतो हा जबरा
धजतो ना ह्याचा कुणि उतराया नखरा !

सायकल्च्या नव शिक्यांस भीत घोर घाली
आडवा हा येउनि त्यां पाडतसे खालीं !
स्वार असो ‘ विद्यार्थी ’, ‘ रँग्लर ’ वा ‘ बाई ’
शिक्षा हा सकलांना समतेनें देई !
धष्टपुष्ट हा खट्याळ गमतो गुंड खरा
लीलेनें अपुल्या पण हांसवि नारि-नरां !

बैरागी, बुढयांना लाजवील ऐशी
रुळणारी दाढी ती शोभे त्यां खाशी !
वासानें नुसत्या हा गर्दी पांगवितो
समरीं हा लढण्याला योग्य वीर गमतो !
यज्ञांला ह्याच्याविण नाहीं पशु दुसरा
बळि जातां, म्हणतो हा, —“ मजला ना विसरा ” ! !

****

मराठी ... ठाणे
१००४२

## कवींनो !

( वृत्त—वसन्त )

कवींच्या सर्व गीतांचा पहा काढून आढावा
जिथें तिथें असे प्रीती, तयांची व्यर्थ ती सेवा !

शीरोभागांस गीतांच्या वृथा प्रस्तावना जाडी
परंतू आंतुनी त्यांच्या दिसूनी येत ना गोडी !

स्त्रियांच्या देखुनी लीला चढे तत्स्फूर्तिला रंग
म्हणूनी प्रेम वर्णाया तयांचे चालती ढंग ।

अघोरी विषमतेनें त्या जिथें हा गांजला देश
तिथें हे प्रेमकाव्यांचे कवी गातात संदेश !

झडावें गान शाहीरी अतां देशामधें फक्त
तथापी गान प्रेमाचें कवी गाण्यांत आसक्त !

रचा हो प्रेमवेड्यांनो ! कसेंही काव्य रंगेल
तया दुर्लक्ष देण्याला अम्हाला काळ सांगेल !

कितीहि पुस्तकें छापा न वाचूं एकही पान
कुठें हें प्रेमरडगाणें ? कुठें तें शाहिरी गान ?

करा हो दुष्ट हेतूनें स्त्रियांचीं वर्णनें खोटीं
अशानें स्त्रीसमाजाचीं न हानी होतसे मोठी

नको तें काव्य गाऊनी भरा राष्ट्रांत अंधार
म्हणूं आम्ही कवी यांचा नसे राष्ट्रास आधार !

अम्हांला द्यावया स्फूर्ती खरा ' शाहीर गोविंद '
कवी हे सर्व आतांचे बुडाले प्रेम-सिंधूंत* !

कवींनो ! चालवा तुम्ही अजूनी प्रेमरडगाणें
कवींचें काव्य वाचाया न आम्ही लागतों देणें !

****

* याला मी तरी अपवाद कसा ठरेन ?

## वांझ

( जाति–मनी )

प्रभो ! काय मी करूं        कसें मज होईना लेकरूं ?
अपार लक्ष्मी वसे घरांत
चाकर कामाला दिनरात
सौख्याची जरि हो बरसात
मन हें लागे झुरूं        कसें मज होईना लेकरूं ?

विवाह होउनि आतां मजला
किती काळ तो लोटुनि गेला
बहार तारुण्याचा सगळा
हाय ! लागला सरूं        कसें मज होईना लेकरूं ?

नवस किती मी संतत केले
पिंपळ वृक्षाभंवतीं फिरले
तुळशीपूजन करून दमले
वठला कायातरू        कसें मज होईना लेकरूं ?

बुवा फकीरां देउनि मान
केली द्रव्याची धुळदाण
दिलें तयांनीं जे वरदान
खरें कोंठवर धरूं        कसें मज होईना लेकरूं ?

उपवासाचें ठसुनी मर्म
अनेक केलें दान नि धर्म
पालटतां नच खडतर कर्म
माथें लागें फिरूं कसें मज होईना लेकरूं ?

' त्यांनीं ' मज डॉक्टरां दाविलें
वद्याचेंही औषध प्यालें
निदान माझें कुणा न झालें
रोगी कैशी ठरूं ? कसें मज होईना लेकरूं ?

गाय वासरू फिरे घेउनी
लतिका हासे फुलां मिरवुनी
घार पिलांना दे भरवूनी
मीच दीन पांखरूं कसें मज होईना लेकरूं ?

पुत्रवती त्या स्त्रिया हिणवती
काय वदूं तुज देवा अंतीं
नसेल जर मज मोक्षप्राप्ती
सुखें मला दे मरूं कसें मज होईना लेकरूं ?

****

## माझी नोकरी

[ 'माझी सिंधु' गेल्याचें दुःख जितकें कवि सरोज-सुहृद यांना झालें नाहीं त्यापेक्षां कितीतरी भयंकर दुःख 'माझी नोकरी' सुटल्यामुळें ह्या महा-पुरुषास ( ! ) झालें आहे. दुःखांतसुद्धां चढाओढ लागण्याचा प्रसंग यावा ना ? अरेरे ! ]

लागली न तों ती—
नोकरी सुटूनियां गेली !

असतांना मी कामांवरती
कांहिं न होतें मजला कमती
अंबारी पण झाली उलटी
अरेरे ! दैवगती फिरली !

कोणी किंवा तिजवर टपुनी
दिला वशीला भला लावुनी
पगार त्यांतहि कमी करूनी
अरेरे ! ओढुनि ती नेली !

लांच न दे मी कसली कांहीं
'वरिष्ठ' म्हणुनी चिडुनी जाई
मला वृथा तो काढुनि देई
अरेरे ! नीति जगीं नुरली !

छान नोकरी ती टिकणारी
जाउनि दैवीं ये बेकारी
कठिण ख़रोखर वेळ दुपारीं
अरेरे ! भूक न कां मेली ?

व्यूह जिवाचा जीवर रचिला
कशी न रुचली तुज ती काळा ?
नागविशी मज घालुनि घाला
अरेरे ! मति माझी भ्रमली !

प्रश्न असा हा बेकारीचा
सुटेल केव्हां नकळे कैसा ?
भोग परंतू आता माझा
अरेरे ! काय दशा आली !

' देवा ! नोकरि तूं ना द्यावी
दिली तरी ती कधिं न सुटावी '
जीव तोडुनी तुज मी विनवीं
अरेरे ! मृत्यु अतां वाली !

****

# संस्कृतिसंरक्षकांचें संमेलन

( जाति–चंद्रकला )



महाबळेश्वरला एकदां संमेलन झालें
पेन्शन घेणारे संस्कृतीसंरक्षक जमले !
शहर स्वतःचें तें सोडुनी परगांवीं गेले
गांवामधिं अपुल्या नको तो 'गोंधळ' त्यां गमलें !
म्हातारे सगळे सभ्य ते वरुनि दिसायाला
पण पिकल्या पानीं रंग तो हिरवा दडलेला !

कार्यक्रम झाला दुपारीं जेवण जिलबीचें
रात्रीला ठरलें नृत्य नी गायन 'छकडीचें!'

रात्र जशी झाली रंग तो जलशाला चढला
म्हातारे सगळे लागले मग डोलायाला!

त्यांतिल 'बनलेले' जरी त्या गाणें ना कळलें
रंग भरायाला नर्तिकेपुढें पुढें सरले!

फाजिल श्रीमंत 'अगाऊ' जे होते जादा
बहाल तिज केला तयांनीं मग दौलतजादा!

गजल, ख्याल, ठुमरी लावणी आणि कव्वालीला
रात्र जशी झाली रंग तो बेमालुम चढला!

गाण्याच्यामध्यें बाटल्या 'व्हिस्की'च्या फुटल्या
पेन्शनरांनीं त्या चोरुनी होत्या आणियल्या!

धुंदित दारूच्या सर्व ते निद्रावश झाले
आणि नर्तकीचें फावुनी मग सगळे गेलें!

बुढ्यांचे पैसे घेतले तिनें लुबाडून
दांत सुवर्णाचे कुणाचे तैसे उपटून!

पहांट ती होतां तिनें मग केला पोबारा!
सकाळ जरि झाली उठेना कोणी म्हातारा!

दंगल ही कळली अचानक पोलिस खात्याला
येउनि मग 'पार्टी' घातला त्यांच्यावर घाला!

दारूबंदीचा मोडला हुकूम सरकारी
जप्त म्हणुनि झाल्या बाटल्या 'व्हिस्की'च्या भारी!

‘चतुर्भूज’ झाले
नवल परी घडलें

त्यांच्यामधिं होता
‘घेंडाला’ ऐशा

‘हात चलाखीनें’
संस्कृति गाजवुनी

संस्कृतीसंरक्षक सगळे
बिचारे बेमालुम सुटले !

‘रिटायर्ड्’ फौजदार कोणी
जाणिलें पोलिस लोकांनीं !

कसेंतरि प्रकरण तें विझलें
जिवानिशिं आले मग बगळे ! !

****

अनुक्रम 23५०२ दि: ३१०५
क्रमांक ९२२ नों: दि: ३०।५

# सासुरवास अर्थात् सूनबाईचें गाणें

( वृत्त–श्यामला )

छि:थू किती ही सासरीं
जंजाळ तो वैऱ्यापरी
लावी जिवाला कातरी
केली किती कामें तरी !

पोसावया जो ठाकला
पैसा असूनी नाडला
कन्येप्रमाणें सून ना
ह्या सासऱ्याच्या अंतरीं !

जैं लग्न झालें, तो धनी
ने काळ त्यांसी ओढुनी
' पाऊल माझें पांढरें
हा काळिमा माझ्यावरी !

कामामधें कंटाळतां
पोथ्यापुराणें वाचतां
' बाहेर ' किंवा हिंडतां
सासू धरी धारेवरी ।

येवो दिवाळी, पाडवा
नाथां स्मरूनी खिन्न व्हा
माहेरिं ना धाडावया
पर्वा कधीं कोणा खरी !

मिष्टान्न खाण्याला पुढें
तें मात्र ' वन्सं, भाउजी '
मी सेविका कामीं पडे
होऊन थट्टा, मस्करी !

सोसूं किती हें सासरीं ?
झाली मनाची खातरी
जो तो इथें इच्छा करी
' मज्जीव जावा सत्वरीं ! '

[ कवि यशवन्तांच्या ' गुलामाच्या गाऱ्हाण्यांस ' ' ह्या सूनबाईच्या–गाण्याचा ' ' सासुरवास' खात्रीनें होणार नाहीं. ]

****

'चतुर्भूज' झाले
नवल परी घडलें
संस्कृतीसंरक्षक सगळे
बिचारे बेमालुम सुटले !

त्यांच्यामधिं होता
'घेंडाला' ऐशा
'रिटायर्ड्' फौजदार कोणी
जाणिलें पोलिस लोकांनीं !

'हात चलाखीनें'
संस्कृति गाजवुनी
कसेंतरि प्रकरण तें विझलें
जिवानिशिं आले मग बगळे ! !

****

अनुक्रम २३५२ ... दि: ...
क्रमांक ...९२१२... नों: दि: ३...

# सासुरवास अर्थात् सूनबाईचें गाणें

( वृत्त–श्यामला )

छिःथू किती ही सासरीं  जंजाळ तो वैऱ्यापरी
लावी जिवाला कातरी  केली किती कामें तरी !

पोसावया जो ठाकला  पैसा असूनी नाडला
कन्येप्रमाणें सून ना  ह्या सासऱ्याच्या अंतरीं !

जैं लग्न झालें, तो धनी  ने काळ त्यांसी ओढुनी
' पाऊल माझें पांढरें  हा काळिमा माझ्यावरी !

कामामधें कंटाळतां  पोथ्यापुराणें वाचतां
' बाहेर ' किंवा हिंडतां  सासू धरी धारेवरी ।

येवो दिवाळी, पाडवा  नाथां स्मरूनी खिन्न व्हा
माहेरिं ना धाडावया  पर्वा कधीं कोणा खरी !

मिष्टान्न खाण्याला पुढें  तें मात्र ' वन्सं, भाउजी '
मी सेविका कामीं पडे  होऊन थट्टा, मस्करी !

सोसूं किती हें सासरीं ?  झाली मनाची खातरी
जो तो इथें इच्छा करी  ' मज्जीव जावा सत्वरीं ! '

[ कवि यशवन्तांच्या ' गुलामाच्या गाऱ्हाण्यांस ' ' ह्या सूनबाईच्या–गाण्याचा ' ' सासुरवास' खात्रीनें होणार नाहीं. ]

****

## घे सुरी—

( जाति–अवनी )

घे सुरी नि मार उरीं, डाव अतां साधी !
विकत मला आणियलें
हौसेनें बाळगिलें
ना कळला हेतु तदा काय तुझा स्वार्थी ?
अंध्यांना आजवरी
जन्म दिला कितिक तरी
भ्रांत पडे कधि न तुला व्हावयास प्राप्ती !
ऐकुनि मम सूर एक
उठति पहांटेस कैक
लोककार्य आचरण्या यापुढें न हातीं !
मनुजाचा बुद्धिभ्रंश
मूकप्राण करित नाश
गरज सरो वैद्य मरो ' हीच काय नीती ?
चरचर हा चीर देह
मांसाचें अन्न सेव
मन निवेल पाहुनिया झालि तुझी तृप्ती !

[ प्रो. मायदेवांनीं ' घे कुठार, कर उगार ' म्हटल्यावर मलाही ' घे सुरी नि मार उरी ' म्हणण्याची दुष्ट ( ! ) बुद्धि कां बरें व्हावी ? ]

****

# त्याचें संततिनियमन !

( जाति—चंद्रकला )

कारकून कोणी तयाला पांच मुलें झालीं
छोटें घर त्याचें मंडई तिथें जणूं भरली !
दोन आकड्यांचा कोठुनी पगार पुरणार ?
महर्गता त्याला तयांतुन करते बेजार !
रात्रंदिन त्यानें खरोखर खरडे घासावे
पोराबाळांना कसेंतरि पोटाला द्यावें !
दुष्काळांत अशा बायको खर्चिक, रागीट
बहुत मुलांचा त्या तियेला आतां ये वीट !
पतीस ती बोले— " तनू मम ढांसळली पुरती
नको मुलें आतां करा तें 'नियमन' यापुढतीं ! "
' बरें ' ! म्हणूनीया तिचा तो विचार त्यां पटला
पत्नीचा सल्ला नेमका हृदयाला भिडला !
मात्र वियोगाचा लोटला अल्प न काल कुठें
स्त्री-सहवासाचा तयाच्या जाळ हृदीं पेटे !
पुनश्च कामुकता तयाची जागृत ती झाली
'नियमन उपकरणीं' अतां पण त्यानें वापरलीं !
जरी 'साधनांनीं' तयानें 'प्रयोग' चालविले
निष्फळ ते ठरुनी ( व्हायचें नाहीं तें चुकलें ! )
'दिवस तिला गेले' ! आणखी वार्ता मग आली—
ह्यावेळीं तिजला अरेरे ! जुळीं मुलें झालीं ! !

****

# मी सिनेटोन काढीन ! जगवीन ! ! आणि बुडवीन् ! ! !

( जाति–फुलवेल )

कर्ज घेऊन मी सिनेटोन काढीन !

हिंमत धरुनी मनांत भारी
माजुन गेली जी बेकारी
नाश करिन ती ह्या व्यवहारीं
लोक जमवून मी सिनेटोन काढीन !

जाहिरात ती पत्रीं देइन
सकल जीव हा कलेस वाहिन
कलावंत ते संनिध आणिन
जूट बनवून मी सिनेटोन काढीन !

लेखकांस मी देइन मान
गोष्टी त्यांच्या घेइन छान
दैन्य तयांचें खास हरीन
स्नेह जोडून मी सिनेटोन काढीन !

गोव्याला मी संतत जाइन
निसर्गशोभा अवलोकीन
सुंदर तेथिल स्त्रिया कुलीन
अहा मिळवून मी सिनेटोन काढीन !

नटांस मोठा पगार देइन
स्वतांस मोटर नवीन आणिन
नटींस घेउनि रोज फिरेन—
मौज मारून मी सिनेटोन काढीन !

हवी तशी मीं चैन करीन
नाचरंगीं तें धन उधळीन
दारु, रेसचें व्यसन धरीन
धुंद होऊन मी सिनेटोन काढीन !

करुनि जाहिरातींचा भपका
नवीन 'चित्रें' दाविन लोकां
'पडतां' तीं पण कोठुनि पैका ?
खर्च सोसून मी सिनेटोन जगवीन ! !

डोक्यावरुनी जातां कर्ज
नादारीचा देईन अर्ज
होती नव्हती सोडुनि लाज
स्वतः होऊन मी सिनेटोन बुडवीन ! ! !

****

# सैंपाकीण नव्हे मालकीण !

( जाति–साकी )

दुर्दैवाचा हाय ! अचानक घाला मजवर आला
कृतांत काळानें मजपासुन नेलें प्राण सखीला !

पोरें माझीं उघडीं पडलीं कोण तयां मायेचें
कोडें पडलें लालन पालन त्यांचें करणें कैसें ?

'आई ! आई !' म्हणून संतत अकांत पोरें करतीं
रोदन त्यांचें कानीं पडतां तुटुनि आंतडीं जातीं !

'रक्षण पोरांचें करण्याला आणिक सैंपाकाला
मिळेल एखादी का बाई' ? विचार मजला पडला !

वर्तमानपत्रांत अखेरीं जाहिरात मीं केली
नशिबानें त्यावेळीं माझी फसगत नाहीं झाली !

अहा ! लाभली सत्वर सुंदर गरीब विधवा बाई
स्वभाव आणिक गोड तिचा तो दिसून मजला येई !

ळळा लागला तिचा मुलांना, तैसा तिजला त्यांचा
सुरळित गाडा चालू झाला पुनश्च संसाराचा !

निज मातेची हळूहळू मग मुलांस विस्मृति झाली
नकळत बाई नवीन त्यांना माता अपुली गमली !

चुकून त्यांनीं तिजला ‘ आई ’ हांक अशी मारियली
हांक मात्र ती मम हृदयाला चरचर कापत गेली !

बनली ‘ आई ’ ही जर त्यांची ( मनांत ये मग शंका
आज उद्यां वा खरोखरी मम होइल पत्नी ही कां ? )

चमत्कार अन् घडून आला थोड्या दिवसामध्यें
ती चंद्रा, मी सागर बनतां प्रीतिस आलें भरतें !

मनास मन तें जुळलें आणिक मंगल अमुचें घडलें
व्हायाचें तें होऊन गेलें ! किती जरीही चुकलें !

‘ सैंपाकिण मालकीण बनली ’ ! जिकडे तिकडे झालें
‘ किर्लोस्कर ’ मासिकीं तिचें अन् चरित्र छापुन आलें ! !

****

## कांहीं म्हणा पण—

( जाति—मंजरी )

मज ‘ भ्याड ’ कुणीही रसिकांनीं बोलले
वा ‘ चोर ’ नांव हें बळें जरी लाधलें
‘ वेड्यां ’त काढिलें किंवा मजला कुणीं
साहीन सर्व तें वदाल तोंडांतुनी !

पण कृपा करूनी ‘ कवी ’ म्हणा ना मला
इरसाल ‘ शिवी ’ त्याविना कुठें आजला ?

****

# नटीच्या नवऱ्याचें गाऱ्हाणें

( जाति–चंद्रकांत )

लग्न नटीशीं लावियलें मी हाय बरें कुठुनी
पश्चात्तापानें मन माझें जातें जळफळुनी !

वरच्या नकली सौंदर्याला भुलला मम जीव
आधीं कळला नव्हता तिचिया हृदयाचा ठाव !

माझ्या श्रीमंतीवर चाले रोज तिचा थाट
पैसे मिळती जे तिजला ती टाकी शिलकेंत !

'स्टुडियों' त ती सर्व दिवसभर कामाला जाते
संध्याकाळीं मोटर घेउनि दूर कुठें फिरते !

दिवेलागणी हो मज तैशी लागे हुरहूर
'अजून येती घरीं न कैशा राणी सरकार' ?

कधीं कधीं तर घरास येते रात्रीं अपरात्रीं
रागानें तिज बोलायाची त्यांत मला चोरी !

झोंप लागलेली मज बघुनी जवळ न ती येते
कुशीस अपुल्या घेउन निजते कुत्रें आवडतें !

आठवड्यांतुन ज्या ज्या दिवशीं सुट्टी तिज मिळते
भेटाया तिज अलोट गर्दी फुकट्यांची जमते !

‘ खास मुलाखत ’ छापाया कुणि संपादक येतो
फोटोग्राफर फोटो घ्याया उगाच धडपडतो !

करारनामा करावयाला मालक नव येती
जलसा गाण्याचा ठरवूनी हौसी जन जाती !

विमा कंपनीचाही येतो दलाल धांवूनी
नवीन साबण देऊन घेई अभिप्राय कोणी !

दिग्दर्शक अन् त्यांतुन येतां घेउन मोटार
फिरावयाला घेउन ‘मैना ’ जातो बाहेर !

उघड्या डोळ्यांनीं मी बघतों तिचे असे खेळ
सहवासाचा लाभ तिच्या मज नाहीं क्षणकाल !

अनेक अफवा तिजविषयीं जन देती पसरून
रोज रोज त्या ऐकुन जातों मनांत करपून !

भोळाशंकर मी, ती गंगा डोक्यावर बसली
स्वातंत्र्याचे हक्क हिरावुन डोईजड बनली!

ताटाखालीं तिनें बनांविलें मजला मार्जार
बिनशर्तीची तिच्यापुढें मी घेतों माघार !


नीरस माझें जीवन असलें कसला पुरुषार्थ ?
लग्न नटीशीं लावियलें मी ह्या जगतीं व्यर्थ !

घटस्फोट ती घेउन माझा जाऊं दे देवा !
मिळेल माझ्या मनास शांती कायमची तेव्हां ! !

****

# कावळ्यास आवाहन

( चाल–अजि अक्रुर हा )



किति वाट तुझी बघुनी  काया शिणली
कावळ्या ! उतर ना खालीं !

मृत सासूचा दिवस दहावा  आज
ये नदीस मी करण्यास !

सत्पुत्र तिला झाला नाहीं  कोणी
ती मला मुलासम मानी !

सौभाग्य तिचें कधींच लोपुनि मागें
प्रीतीचे तुटले धागे !

ती सोडुनियां जातां मजला सगळें
नशिबाला करणें आलें !

ह्या तिच्या दशम दिवसाला
मी येउनि नदिकांठाला
श्राद्धाचा विधि तो केला

अन् पिंड तिचा ठेविं अतां मैदानीं
कावळ्या ! शीव त्या बघुनी !

किति वाट तुझी बघुनी शिणला जीव
पिंडाला सत्वर शीव !

मी तिष्ठत हा उघडा होउनि सगळा
नेसुनिया पंचा ओला !

हा वायु कसा त्यांतुनि भणभण सुटला
कांपरें भरे अंगाला !

ढग आकाशीं जमले काळे काळे
भिजवाया मजला टपले !

किति राहुं उभा घेउनि वेष उदास
झाले रे तासन् तास !

कावळ्या ! धांव रे घेई
तुज दया न कैशी येई
सुटका मम करुनी देई

मज कंटाळा आला अगदीं आला
कावळ्या ! प्राण कळवळला !

तूं पिंडाला अजुनी ना शिवलास
शंका मग येइ मनांस !
मम सासूचा जीव गुंतुनी कोठें
आशा ती उरली वाटे !
पण ग्वाही मी देतों आतां तुजला
जा कळीव ती सासूला !
‘ इस्टेट ’ तिची सगळी ‘ हाताळीन ’
कन्येस तिच्या सुखवीन !
आत्म्यास तिच्या लाभो कायम शांती
पण तुला अखेर विनंती— !
ये धांवत असशिल जेथें
कर स्पर्श झणीं पिंडातें
ना उचलुनि मी दर्भातें
त्या दर्भाचा करिन कावळा लटका
जा ‘ उडत ’ कुठें मग लेका ! !

****

## गोड गुपित

( जाति–रति )

(श्रीमंत स. र. पंतसाचिव यांची ‘ रति ’ ही सुंदर कविता ज्यांनीं वाचली असेल त्यांना ह्या कवितेंतील रहस्य (!) अधिक कळून येईल.)

सोड तुझा हेका आतां, लाविशि कां चटका ?
नकळत पहिल्या भेटीसरशीं
भुरळ मनाला पाडुनि खाशी
भ्रमरासम कां निघुनी जाशी
झुलवुनि ही कलिका आतां, लाविशि कां चटका ?
नांव, कीर्त तव ऐकत होतें
स्वरूप देखुनि भाळुनि जातें
त्वत्प्रीतीची कांस धरीतें
रात्रंदिन घटका आतां, लाविशि कां चटका !
प्रेमळ अस्फुटता वदण्याची
झडती चकमक ती डोळ्यांची
दिसुनी आज न येते कैशी ?
पांघरुनी बुरखा आतां, लाविशि कां चटका ?
‘ सौख्य जिवाला हवें म्हणूनी
दाविलेंस हृदया उकलूनी ’
प्रेम खरें तव घ्याया कळुनी—
आलें तव मुलुखां आतां, लाविशि कां चटका ?

फिरूनिया तव जाई बुद्धी
माझी नुरली तुजला शुद्धी
परंतु मी तव झालें वंदी
सुटत न हा विळखा आतां, लाविशि कां चटका ?

लटका होऊनि तूं गारूडी
माझ्याशीं कां करशि लबाडी ?
प्रीतीनें तव झालें वेडी
तरुला जणुं लतिका आतां, लाविशि कां चटका ?


हुरळुनि अगदीं मी बघ गेलें
मन हें माझें तुजवर जडलें
मदनानें शरिरास पीडिलें
शांतवि हा कडका आतां, लाविशि कां चटका ?

गळ्यांत माझ्या कर घालुनिया
कवटाळशि मज कां नच राया ?
अंत किती बघसी शिणवाया ?
सत्वर घेइं मुका आतां, लाविशि कां चटका ?

बघशी मजला कां गुरगुरुनी ?
पुसशी भाषण कांहिं न करुनी
गेलें मी बघ पार गळूनी
सोसुं किती सणका आतां, लाविशि कां चटका ?

जिवास भोळ्या खेळविणारा
सलगी माझ्याशीं करणारा
अखंड मज कां देशि न थारा ?
फुगवुनि प्रेमफुगा आतां, लाविशि कां चटका ?

लग्न करूनी तूं माझ्याशीं
साक्ष पटूं दे सहवासाची
सांगत तोंवर नाहिं कुणांसी—
' मी मनि, तूं बोका '       आतां, लाविशि कां चटका ?



[ सहवासोत्तर विवाहाचें हें ' गोड गुपित ' सनातन्यांना आणि संस्कृतिसंरक्षकांना न कळण्यांतच खरी मौज नाहीं का ? ]

****

# नटींचा संप

( जाति–साकी )

आज सिनेमा सृष्टीमध्यें उडला हाहाःकार
सर्व नटींनी धारण केला संपाचा अवतार !
देशामध्यें जिकडे तिकडे कामकऱ्यांचे संप–
बघून, आली काय नटींना स्फूर्ती आपोआप !
दिग्दर्शक मंडळी आणखी सिनेटोनचे स्वामी
हताश झाले ! बसला म्हणुनी धंदा अपुला नामी !
नटींबरोबर नटवर्गाची कुचंबणाही झाली
बेकारीची कुऱ्हाड त्यांच्या डोक्यावरती पडली !
चित्रपटांचे नवीन नमुने आतां नच दिसणार
जुनीं तींच तीं चित्रें प्रेक्षक पुन्हां किती बघणार ?
सिनेकथा त्या लिहुन बिचारे लेखक खाती हाय
पोटावरती पाय तयांच्या दिले नटींनीं काय ?
संप नटींना करावयाला कारण कसलें घडलें
संप तयांचा मिटवायाला मध्यस्थीही थकले !
काय मागणी असे नटींची विचारणा मग झाली
एकमुखानें गर्जुनि त्यांनीं अखेर जाहिर केली— !
' कृष्णराव '* ते सेन्सर बोर्डावरी नकोत अम्हांला
संस्कृति त्यांची हाणुनि पाडिल नखरा अमुचा सगळा ! !

*( हे कृष्णराव कोण ? अरेरे ! हें सांगणें सुद्धां अश्लील नव्हे ना ? कृष्णराव, क्षमा करा. )

# सिनेसृष्टींत आनंदी आनंद !

( वृत्त—वसन्त, गज्जल )

सिनेसृष्टीमधें झाला कशाचा आज आनंद
नटा-दिग्दर्शकासंगें नटी त्या जाहल्या धुंद !
जिथें तेथें अतां होई कसा जोरांत जल्लोष
नटी त्या नाचती, गाती पुऱ्या होऊन बेहोष !
बड्या त्या मेजवान्याही सिनेक्षेत्रामधें होती
कुणी ते वांटती पेढे कुणी अन् 'पेय' ते घेती !
दिसाची एक ती सुट्टी सिनेमाचे धनी देती
कलावंतास अन् लाभे सुखाची गोड विश्रांती !
मिळे स्वातंत्र्य तें किंवा सिनेसृष्टींत सर्वांस
म्हणूनी जाहला जो तो दिवाणा आजला खास !
वृथा जीं बंधनें होतीं अहा लोपून तीं पार
अतां कोणांस ना भीती कराया स्वैर संचार !
भरे आनंद ! आनंद ! सिनेसृष्टीमधें पूर्ण
'इथें अश्लीलता भारी ' अतां गर्जेल ना कोण !
वृथा ती फिल्म कापाया बळें धांवेल ना कोणी
विषारी संस्कृतीं कात्री पुरी ती जाय मोडूनी !
सिने-सेन्सॉर बोर्डाचे गळाले ' श्लील मार्तंड '
सिनेसृष्टीमधें झाला म्हणूनी गोड आनंद !

---

( एक वर्षानंतरच सेन्सॉर बोर्डाकडून कृष्णरावांची उचलबांगडी झाली. अरेरे ! कोण हा प्रसंग ! आणि फिरून मला अशी कविता करण्याचा 'चान्स' यावा ना ! कृष्णराव, अखेरची क्षमा करा बुवा ! )

## तरुणींचा ताफा !

( जाति—चंद्रकांत )

[ युद्धजन्य परिस्थितींत नोकरी पटकाविण्यासाठीं एका ' रुक्ष ' ऑफिसांत आलेला ' तरुणींचा ताफा ' पाहून सदरहू कविता स्फुरण पावली आहे. ]

चुकून आला आज कचेरींत ताफा तरुणींचा
बागबगीचा फुलला खडतर वातावरणाचा !

एकामागुन एक किती ह्या मुली इथें जमल्या
माळेमधल्या मुग्ध कळ्या कीं दिसती फुललेल्या !

जाइ, जुई, मोगरा, मालती, गुलाब, शेवंती
सुवास उधळत सर्व तऱ्हेचीं सुमनें हीं येतीं ?

आकाशांतिल लुकलुकणाऱ्या अवतरल्या तारा
कारंजाच्या उडून किंवा आल्या जलधारा !

गंधर्वाचें विमान नटलें दिव्य अप्सरांनीं
' छत्र्या ' घेउनि उड्या टाकिल्या काय इथें त्यांनीं ?

' नागकन्यका ' भरून आली कोंकणची नाव
पोटासाठीं इथें घेतली सर्वांनीं धांव ?

गंगेवरतीं तरंगणाऱ्या दीपांच्या माला
हांसत, नाचत इथें पातल्या किंवा वनमाला ?

फूलपांखरें, कबूतरें छे ! चिमण्या गुलजार
मनांत आल्या धरून कसल्या आशा दमदार ?

बुलबुल, भारद्वाज, कोकिला, मयूर, चंडोल
त्या पक्ष्यांचा ' ऑर्केस्ट्रा ' हा जमला बहुमोल !

सुवर्ण, चांदी, हिरे, माणकें, जवाहीर, मोतीं
सराफजीच्या तिजोरींतुनी प्रदर्शना येती !

यमुनेकांठीं गोकुळांतल्या गोपी त्या सगळ्या
खेळायाचें सोडुन येथें आज कशा फिरल्या ?

धांगडधिंगा घालायाची सोडुन मधुरात
मुली मंगळागौरीच्या कां येथें जमल्यात ?

' संक्रातीचें वाण ' घेउनी नाजुक हातांत
नटुनी थटुनी गोंडस बाला आल्या डौलांत ?

चैत्राचें तें ' हळदीकुंकू ' किंवा लुटण्याला
' हुजूरपागा ' उधळुन आला पोरींचा मेळा !

तिलोत्तमेच्या स्त्री-राज्याचा शेवट होऊन
उरली सुरली फौज काय ती आली धांवून ?

मात्र फौज ती बघून कवि हा वेडावुन गेला
नव्या युगीं त्या गमे जमाना नवा सुरू झाला !


जेथें तेथें तरुणांसोबत तरुणी येणार
भिडवुनि खांदा खांद्याला अन् कामें करणार !

कामामध्यें परस्परांचें मन घेइल ओढ
सायासाविण जमतिल लग्नें प्रीतीचीं गोड !!

****

# घेतली कशीतरी स्वाक्षरी !

( जाति–मनि )



अचाट यत्नान्तरीं घेतली कशीतरी स्वाक्षरी !
स्त्रीपुरुषांचा अफाट मेळा
जमला होता आज सभेला
सुंदर वक्ता त्यांत लाभला
संधी येउनि खरी घेतली कशीतरी स्वाक्षरी !

सभा शेवटीं जों न संपली
फलाटवरतीं पोरें जमलीं
स्फूर्ति मला येउन त्यावेळीं
घुसुनि अघाडीवरी घेतली कशीतरी स्वाक्षरी !

गर्दीमधुनी पुढती घुसतां
धक्काबुक्की करतां करतां
घामाघुम जिव झाला नुसता
सोसुन हें संगरीं घेतली कशीतरी स्वाक्षरी !

धांदल माझी कोण उडाली
गर्दीमध्यें टोपी गेली
वहाण पायांमधली तुटली
हानी झाली तरी घेतली कशीतरी स्वाक्षरी !

चष्मा डोळ्यांवरचा फुटला
कोट-खिसा कुणि कापुनि नेला
चित्त न ठायीं त्यावेळेला
शिस्त मोडुनी बरी घेतली कशीतरी स्वाक्षरी !

स्वयंसेवकांनीं मज धरलें
वक्त्यापासुन दूर लोटलें
ब्रीदाचें नच तारूं झुकलें—
उलटा वारा जरी घेतली कशीतरी स्वाक्षरी !

दुःख संपतां काल सुखाचा
कष्टानंतर लाभ 'सही'चा
अखेर मजला हो कायमचा
खात्री पटुनी पुरी घेतली कशीतरी स्वाक्षरी !

****

# पापड नव्हे–तिळपापड !

( जाति–चंद्रकला )



पापड उडदाचे करावे ऐन उन्हाळ्यांत
संसारीं माझ्या ठरविला पत्नीनें बेत !

केळीचा खुंट आणिला जाउनि बाजारीं
इतर पदार्थांची तयारी होइ तिची जारी !

खुंटाचें पाणी काढिलें रात्रीं ठेंचून
उडदाचें पीठ ठेविलें तयांत भिजवून !

दुसऱ्या दिवसांला जहाले तयार ते ‘ गोळे ’
अन् ‘ बोव्या ’ त्यांच्या दिसाया पेढे जणुं गमले !

दुपारच्या वेळीं बायका घरीं किती जमल्या
पापड लाटुनि त्या बिचाऱ्या थकूनिया गेल्या !

कांद्याचे पोहे गरम ते त्यांच्यास्तव झाले
नंतरही केले चहाचे कितीतरी प्याले !

उघड्या गच्चींत टाकले पापड वाळाया
दुपार सरतांना घरोघर गेल्या त्या बाया !

पापड वर्षाचे एकदां कसेतरी झाले
पत्नी मग देई श्वास ते सोडुनि दबलेले !

पापड वाळाया कडक ते दुसऱ्या दिवसाला
पसरुनि गच्चींत प्रिया ती जाइं सिनेमाला !

दुपारचा ‘ शो ’ तो प्रिया ती बघतांना रमली
वार्ता पण इकडे अचानक कसली हो घडली !

वादळ जोराचे हवेंमधिं सुटूनिया गेलें
पाल्यासम उडले भराभर पापड सुकलेले !

दूरदूर गेले उडूनी पापड ते दुबळे
गच्चींतिल अमुच्या क्षणांमधिं वैभव ओसरलें !

पत्नीचा फेरा सिने ‘ शो ’ सुटूनि घरीं आला
पापड ना दिसतां तिचा मग ‘तिळपापड’ झाला !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 23526 दि: 3/04
क्रमांक 9?? नों: दि: 3...

## नटीचें रडगाणें

( जाति–अवनी )

हाय ! हाय ! मी कुठून ती नटी जहालें
' सभ्य स्त्री ' नांव खरें पार मम बुडालें !
पडुनि कशी मजसि भुरळ
आप्त-इष्ट त्यजुनि सकल
सिनेमांत कीर्ती, धन मिळविण्या निघालें !
नट आणिक दिग्दर्शक
प्रेमवीर सर्व लोक
सांगु कसें करति तिथें नित्य प्रेमचाळे !
संगतींत मी त्यांच्या
आधिन हो व्यसनांच्या
' मद्य ', ' रेस ' पायीं धन जाइ जें मिळालें !
मजविषयीं शंका त्या
घेती जन भलभलत्या
शीलावर मम खुशाल घालतात घाले !
रूप, गुणांविषयीं तर
लेखक ना करुनि कदर
टीकेचें ओकतात गरळ तें निराळें !
धंदा हा पत्करला
काय गुन्हा हो घडला ?
कला-प्रेम रसिकांचें वाटतें निमालें !
यौवन जों रसरसतें
काम कुठें तरि मिळतें
सरतां तें, जग वदेल—' बाई ! कर काळें ! ! '

****

# तो कारकून—आणि लेखक !

(वृत्त–दिंडी)

असे सरकारी कुणी कारकून
काम करणें तें गमे त्यास न्यून !
मान मोठा जरि नसे लाभलेला
मनीं समजे तो शाहणा स्वताला !

मिळें दैवानें त्यास जो पगार
त्यास वाटे तो अल्प बेसुमार !
वृत्ति नाहीं त्यांतून समाधानी
मात्र वरुनी दाखवी स्वाभिमानी !

काम कोठेंही जरी तयें केलें
'फार' म्हणुनी तो मदत हवी बोले !
देह ज्याचा मुळचाच सुदाम्याचा
भार कसला त्यां सहन व्हावयाचा ?

व्यसन नाहीं त्या पान–तमाखूचें
वेड मोठें पण फार लेखनाचें !
कथा-काव्यें इंग्रजी सुप्रसिद्ध
लिहित असतो चोरून मराठींत !

स्वतालागीं समजून ‘ ब्रह्मचारी ’
मात्र प्रीतीच्या कथा तो चितारी !
विवाहाचा काढतां प्रश्न त्यासी
स्तब्ध राही हा नवा रामदासी !

फिरायाला जेधवां दूर जातो
छुपा ‘ कॅमेरा ’ जवळ बाळगीतों
अचुक दिसतां मार्गांत ‘ मस्त ’ बाई
तिचा बेमालुम ‘ स्नॅपशॉट ’ घेई !

थोर व्यक्तींची घ्यावयास भेट
काढि दौरा हा करुनि पायपीट !
मिळे त्यांतुनि जर ‘ नटी ’ अकस्मात
मुलाखत तो रंगवी मासिकांत !

पुरोगामी हा म्हणवितो स्वताला
त्यजुनि कमरेचें बांधि मस्तकाला !
दौड अकलेची मारि लांब लांब
घाल देवा ! तरि त्यास तूं लगाम !!

****

# हाय ! हाय ! तो भाला !!

( जाति–चंद्रकांत )

( एक दणदणीत, झणझणीत आणि ठणठणीत विलापिका ! )

( भालाकार ! क्षमा करा ! ! )

हाय ! हाय ! तो लोपुनि गेला आज कसा भाला
सनातनी मतपत्र तयावर कसला ये घाला ?

बंद कशानें एकाएकीं पडलें तें पत्र
जन्माच्या कां वेळीं नव्हतें मंगल नक्षत्र ?

सनातन्यांची बाजू आतां कशांत येईल
राजकारणामधें कोण तो गुलाल उधळील ?

जुनीपुराणी सारी अपुली शिकवण तेजस्वी–
देइल आतां कोण लिहूनी भाषा ओजस्वी ?

नवशब्दांची टांकसाळ ती कोठें दिसणार ?
भाला मोडुनि स्वस्थ बैसले जर भालाकार !

ब्राह्मण्याचा कोण अतां तो धरील अभिमान
वर्णसंकरावरी चिडुनि अन् होइल बेभान !

सुधारकांना कोण भयंकर धक्का देईल
सनातनी धर्माचें अपुल्या स्तोम माजवील ?

सहभोजन जे करती त्यांना टाकुनि वाळींत
भ्रष्टाकाराबद्दल येइल कुणा बरें चीड ?

' रोटीबंदी, ' ' बेटीबंदी ' करावया पार
कोण जिवाची शिकस्त करुनी आतां लढणार ?

अस्पृश्यांना मंदिरांत ती दर्शनांस बंदी–
करावयाला धांव कोण हो घेइल यापुढतीं !

' पंचगव्य ' प्राशून श्रावणी ती करण्याकरतां
कोण विनंती ब्रह्मजनांना करील हो आतां ?

' अंडीं सोडुनि भेंडी ' खावी तरुणांनीं सकल
लवलवीत अन् कोण शिप्याचें महत्त्व सांगेल ?

' द्रोणाबद्दल वाट्या ' असती सुलभ भोजनाला
पटवुन देइल कोण अतां हें मानवजातीला !

आणि स्त्रियांना पोरें झालीं एकाहुनि फार
' बाबागाडी ' वापरण्याला कोण सांगणार ?

' लाठिबंद ' होण्यास कोण तो देइल संदेश
' बोलूकाका ' मुळीं न होणें मिळेल उपदेश ?

' धर्मकारणासाठीं आधीं सोसावें मरण
राजकारणीं मग चमकावें '–वदेल हें कोण ?

' मी टिळकांचा घट्ट, पट्ट नी मठ्ठ असें शिष्य '
दिसावयाचें पत्रामध्यें कुठल्या हें दृश्य ?

सल्ला देइल कोण तुम्हांला कौन्सिलांत जावें
मिळेल तें तें पदरीं घ्यावें आणिक भांडावें !

कौन्सिलमध्यें ‘ घुसा आणखी घांसा ’ हा मंत्र
कोठुनि सांगा दिसावयाचा आतां इतरत्र ?

असहकारिता झूट आणखी झूट अहिंसा ती
स्पष्टपणें लिहिणार कोण तें पत्रांतुन अगदीं !

गांधीजींना जरी ‘ महात्मा ’ जग दे ठरवून
‘ मोहात्मा ’ तो खास कोण हें वदेल गर्जून !

परदेशी तो खजूर खाती गांधी बेताल
त्यांच्या नादीं लागुं नये हें कोण निवेदील ?

टिळकानंतर नसे पुढारी भारत देशाला
छातिठोक हें गर्जुन गेला काय बरें भाला ?

टिळकानंतर त्यांचे चेले नेते हे कसले ?
‘ तात्या ’ देती फिरवुन पगडी भाल्यानें कथिलें !

‘ भाऱ्यां ’ नीं सहभोजन केलें त्या कोल्हापुरला
घ्यावें ‘ प्रायश्चित्त ’ तयांनीं भाला ओरडला !

‘ गोमाता ही माता नाहीं ’ वदला जो ‘ वीर ’
छातींत त्याच्या जाउन बसला भाल्याचा वार !

‘ अनुलोमात्मक विवाह ’ केला ज्या वेड्या कविनें
फटके मारुनि धिंड काढली त्याची भाल्यानें !

‘ लखुअण्णा ’ च्या निवडणुकीला भाला ये आड
बुरख्यातिल अन् ‘ आलमगिरा ’ ला वदला तो भ्याड !

निजशौर्यानें चमकुनि गेला खरोखरी भाला
दर्शन त्याचें होणें नाहीं आतां कोणाला !

वर्तमानपत्रांत मिळवुनी दिगंत ती कीर्ती
सनातन्यांचा भाला पडला कां धारातीर्थीं ?

भाल्यासाठीं सनातनी ते सारे हळहळती
मुखपत्राविण कोण तयांची गाइल ती महती ?

सनातन्यांनो ! आवरता घ्या तो अपुला शोक
भाल्याचें तें पुढें करावें कार्य रोखठोक !

'बरची' किंवा 'बिचवा' आतां हातीं घ्या कोणी
चित्र तयाचें रंगविण्याला तयार हा प्राणी !!

****

## गुंड कवि मी —

(चाल—फटका)

निसर्ग-गीतें गाउनि गेले सृष्टिसतीचे बालकवि
विलीन होतां संस्थानें तीं उघडे पडले राजकवि !

काव्यकलेवर जीवन जगतीं लाचारीनें लोककवि
नवकाव्यें दुर्बोध खरडती सांप्रतचे चवचाल* कवि !

महाकवि न कोणी निपजे
अधःपतन हें काय असें ?

नवकाव्याच्या आगींत ओतुनि तेल, योजितो युक्ति नवी
अखेरचा हो बनुनी जातो – गुंड कवि मी गुंड कवि !!

****

[ *चवचाल—ज्यांच्या काव्याला ताल, छंद, वृत्त, अर्थ वगैरेंचीं बंधनें नाहींत अशीं काव्यें खरडणारे मुक्तछंदी–नव्हे–छंदी–फंदी कवि ! ]

# एखाद्या कवीचें नशीब

( वृत्त–शा. विक्रीडित )

कांहीं थोर कवी सदा झळकती मासीक-पत्रांतुनी
कांहीं येति पुढें–कुणी रसिक त्यां डोक्यावरी घेउनी !
कांहीं लावुनि बैसतात वशिला छापावया काव्य तें
एखादा 'कवडा '*कवी न ठरुनी– जाई दडूनी कुठें !

संस्थानीक महा-कवीस धरिती राजाश्रयीं आपुल्या
कोणाला कवितेवरीं मिळकती होतातही चांगल्या !
कोणाचीं नव पुस्तकें खपुनियां आवृत्तिही वाढते
एखादें पण ' चोपडें ' निघुनियां अंगावरीं शेकतें !


बाडें घेऊनि काव्य-गायक कुठें गाण्यांप्रती धांवती
श्रोते मार्मिक (!) काव्य-गान श्रवतां टीकेस आरंभती !
कोणा भूषविती अनेक कविता त्याच्यामुखीं गाउनी
एखाद्या भसड्या कवीस अगदीं देतात फेटाळुनी !

चाले भेद असा कवींत बहुधा प्रख्यात सारे जरी
एखादा घसरे तसाच चुकुनी येण्यापुढें यापरी !
पाही कोण अशा कवीस बुडत्या? जो तो असे आपला
देवा ! दे प्रतिभा कशी तरि तया, त्यासाठिं तो नाडला !!

* [ शाणोल्लीढ मण्याप्रमाणें पुण्याच्या शैक्षणिक वातावावरणांत चमकूं लागणारे पदवीधर ' अन् ' शिक्षणशास्त्री यांनीं हा नवीन अर्थाचा शब्द ( भालाकारांप्रमाणेंच ) मोठ्या प्रयत्नानें शोधून काढला आहे ! )

# अरे ! मी राजकवि झालों !

( जाति—चंद्रकांत )



[ माझे कवि-मित्र श्री. झोटिंग भोकरकर, ‘ कणिका कुटी ’ संस्थान भोकरवाडी ( बुद्रुक ), हे ह्या दिवाळीच्या सुमुहूर्तावर ‘ राजकवि कसे झाले ’ ह्याचा वृत्तान्त खालील कवितेंत सादर करीत आहें. चुकून तो खोटा ठरल्यास कवीचें त्यांत थोडेंच बिघडणार आहे ? ]

‘ चंद्रशेखरां ’ नंतर ‘ तांबे ’ आणिक ‘ यशवन्त ’
काव्यगुणानें ‘ राजकवी ’ ते झाले प्रख्यात !

राजाश्रय लाभतां मिळतसे तनखा वर्षाला
मदत खरी ती गरीब कविच्या फुगत प्रपंचाला !

काय वाटलें कुठून मज हो एकाकीं स्फूर्ती
‘ राजकवीही ’ बनून आपण मिळवावी कीर्ती !

( संपादक छापतात कविता फुकट सदा अपुल्या
पैची प्राप्ती त्यांच्याकडुनी कांहीं नच केल्या ! )

‘ राजकवी ’ मी व्हावें म्हणुनी प्रयत्न चालविला
यत्नावांचुन जगतीं सांगा लाभ कुणा झाला ?

अनेक संस्थानें तीं बघुनी हिंदुस्थानांत
महत् प्रयासें अखेर शोधुनि काढियलें त्यांत !

‘ भोकरवाडी ’ नांवाचें तें लहान संस्थान
रहिवासी मी झालों तेथें धरून अभिमान !

संस्थानिक तेथील ‘ घाटगे ’ समरबहाद्दर
शिक्षण त्यांचें यथा यथा पण श्रीमंती फार !

वर्तमानपत्रांत तयांचा उदो उदो केला
लहान संस्थानाचा मोठा प्रताप गाजविला !

श्रीमंतांचा वाढदिवस जो येई वर्षाला
त्यांच्यावरतीं काव्य कराया नेम न तो चुकला !

संस्थानांतिल कामगिरी ती बघूनिया त्यांची
गुणवर्णनपर सरबत्ती मीं केली काव्याची !

श्रीमंतांच्या मुला-मुलींच्या लग्नाच्या वेळीं
माझ्यावांचुनि ‘ मंगलाष्टकें ’ कोणी ना केलीं !

संस्थानांतुन ‘ कवी ’ म्हणूनी प्रसिद्धि मम झाली
वासरांत ती गाय लंगडी शोभुनिया गेली !
श्रीमंतांची स्वारी झाली मजवरती खूष
सहज म्हणाले आणि एकदां होउन बेहोष—!
“ काय बक्षिसी हवी तुला रे दे मज सांगून
काव्य तुझें वाचून जहाला वेडा मम प्राण ! ”
श्रीमंतांची मर्जी होतां मुजरा मीं केला
आणिक वदलों—“ राजकवी मज करा तुम्ही अपुला ! ”
श्रीमंतांनीं लगेंच अपुला भरवुनि दरबार
“ राजकवी मी झालों–” ऐसें केलें जाहीर !
‘ मराठशाही पागोटें अन् कांबळ ती काळी
भाला आणिक तसा मिळाला ’– अहेर त्यावेळीं !
जिकडे तिकडे होइ दवंडी नंतर संस्थानीं
‘ राजकवी मी बनलो ’ – ! झालें सकलांच्या कानीं !
हाय ! परतूं परप्रांतांतिल कवी तसे कवडे
साशंकेनें मजला बघती वासुनियां तोंडें ! !

****

# अरे ! मी राजकवि होतों ! !

( जाति–शुभवदना )

[ माझें मित्र राजकवि श्री. झोटिंग भोकरकर ‘ कणिका ’ कुटी, संस्थान भोकरवाडी ( बुद्रुक ) यांची ही विलापिका मलाच पुन्हां सादर करण्याचा ‘ चान्स ’ यावा नां ? अरेरे ! कोण हा प्रसंग ! ]

कष्टानें मोठ्या मी राजकवी झालों
संस्थानें बुडतां पण पुरता मी जिरलों !
राजकवी होतों मी ‘ भोकरवाडीचा ’
थाट कसा वर्णूं तो होता स्वारीचा !
राजाश्रय लाभुनि, मम नांव किती झालें
गारिबाचें दैन्य तसें थोडें तरि फिटलें !
हाय ! परी काळाच्या तोंडीं सांपडलों
वैभव तें ओसरून खालीं गडगडलों !
कॉंग्रेस्‌चें राज्य सुरू होतां देशांत
विलिन सर्व संस्थानें झालीं निमिषांत !
संस्थानिक सगळे ते अधिकारां मुकले
त्यांचें अन् राजकवी त्यांसह आटपले !
‘ वर्षासन ’ बुडुनी मी निराधार बनलों
वेताळासम आणिक पूर्वपदीं आलों !

****

# मळमळ

( जाति–अवनी )

[ दऱ्याखोऱ्यांत हिंडणाऱ्या शाहिराला एकसारखी 'तळमळ' लागते. प्रयत्नांतीं प्रसिद्धीस न येणाऱ्या नवख्या कवीस ' मळमळ ' तरी कां सुटूं नये ? ]

कधिं प्रसिद्ध कविता ह्या व्हायच्या कळेना
करि अचाट मी प्रयत्न विजय तो मिळेना !

सतत बसुनि रात्रंदिन
निर्मितसें काव्य-कुरण[1]
छापुनि परि एकही न
दृष्टितें दिसेना !

शाहिर, कवि सान थोर
काव्य-वृष्टि करिति घोर
दृश्य बघुनि तें समोर
स्फूर्ति आवरेना !

---

( १ ) कवींनीं ' जिवाचें रान ' केलें कीं ' काव्याचें कुरण ' निर्माण झालेंच म्हणून समजा.

छापविण्या काव्यनिधी
आटविला रुधिरुदधी
संपादक 'वैद्य' [२] कधीं
विकृती बघेना !

'स्त्री' बनुनी मासिकांत
कविता जरि धाडिल्यात
बिंग फुटुनि दशदिशांत
होय मात्र दैना !

पैसा मम खर्चुनीच
काव्यग्रंथ छापण्यास
विनाविलें प्रकाशिकेस
परि रुकार दे ना !

'ज्ञानागर' मुंबईचें
निवडीना मम 'वेंचे'
अन् प्रो० 'हिज़ मास्टर'चें
गान मम करेना !

---

( २ ) मोठमोठ्या विद्वान् स्त्री-पुरुषांना डॉक्टरी ज्ञानाचा गंधही नसतांना ' डॉक्टर ' ही पदवी मिळालेली दृष्टीस पडते. तद्नुसार मासिक पत्रांच्या प्रसिद्ध संपादकांना आयुर्वेदाची माहिती नसली तरी ' वैद्य ' पदवी बहाल करण्यास कोणतीच हरकत नाहीं. मात्र ज्या संपादकांना आपलें पत्र अगर मासिक चालविण्याची ऐपत किंवा ज्ञान नसेल त्यांना ' वैदू ' म्हणून खुशाल संबोधावें ! बृहन्महाराष्ट्रांत असल्या अधिकारी वैदूंची पैदास कांहीं कमी नाहीं !

सतत मिळविण्यांस नांव
धडपडतो तरि न वाव
कवितेची कठिण हांव
अजुनही जिरेना !

'हा नाद सोड सोड'
मित्र करिति बोध गोड
मरणाविण दुष्ट खोड
जायची कधीं ना !

मळमळ ही नित्य अशी
नच देई सुख, सरशी
पाडुनिया तोंडघशीं—
अंतही करेना ! !

****

## एक मागणें

( जाति—चंद्रकला )

काशीचे पंडे
चालतील देवा !
दिल्लीचे सोदे
परवडले तेही
गुजर मारवाडी
तेही रुचतील
नको परी देवा !
काळिज नसलेले

आणखी बडवे पंढरिचे
लाटले त्यांनीं जरि पैसे !
मवाली आणिक ममईचे
कापुनी जरि घेतात खिसे !
असो वा पठाण काबुलचे
भयंकर व्याज जरी त्यांचें !
भेटवूं ह्या जन्मामध्यें
भामटे गुंड पुण्याचे ते ! !

****

[ माझें गांव पुणें—–अरेरे ! हें सुद्धां सांगावें लागतें ना ? ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 23525 वि: 3CL9
क्रमांक 94612 नों: दि: 3.01.75

# स्मृति–गीत

( जाति–चंद्रकांत )

आठवतो तुज कविते! कां तो काळ फजीतीचा?
बाळपणाचा, अज्ञानाचा, ‘नक्कल’ करण्याचा!

काव्यांगाचें ज्ञान चोरटें, चोरटाच जीव
कळलें नव्हतें काव्य काय तें? स्फूर्ती निर्जीव!

छापित नव्हते संपादक कुणि, कविता बालांच्या
‘कचरा’ म्हणुनी टाकित होते भक्ष्यीं कालाच्या!

डंसति परोपरि कोमल हृदया त्यांतुनही टीका
गेले ते दिन! कविते! यापरि देउनिया ठपका!

बाळपणींच्या कविता सगळ्या स्फुरति आज फिरुनी
मासिकपत्रांमधें तयांची गर्दी छापूनी!

तूं कविता ती, तोच कवी मी, निंदकही तेच
परि होणारी टीका आतां डंसते ना खास!

कशांस आतां असें निराशा? झालें तें गेलें
‘बनला’ कवि तो दाद न देई कुणी जरी भुंकले!!

****

# गांधिलमाशी

( जाति–फुलवेल )

[ कै. माधवानुजांस एक दिवस ‘ विंचू ’ चावला ! त्याच्या वेदना इतक्या असह्य झाल्या, कीं ते चोवीस तासपर्यंत बिछान्यावर सारखे तळमळत होते. कर्मधर्मसंयोगानें एका नवख्या कवीस (टीकेची) ‘ गांधिलमाशी ’ डसली. तिच्या वेदनांमुळें त्या कवीची फार दुर्धर स्थिति झालीच झाली; परंतु त्यांतही त्याला जो काव्य–स्फूर्तीचा पान्हा फुटला तो असा— ]

दुःसह ऐशी  डसली मज गांधिलमाशी !
सर्वांगाचा झाला होम
कीं आगीचा उसळुनि डोंब
व्यर्थ कराया लावी बोंब[१] ?
हाय जिवाशीं  डसली मज गांधिलमाशी !
दिसावयातें क्षुद्र खरोखर
परी तियेचा दंश भयंकर
करपुनि काढी कोमल अंतर
जीवननाशी  डसली मज गांधिलमाशी !

---

( १ ) हा अश्लील ( ? ) शब्द काव्यांत घुसडल्याबद्दल उदार ( ! ) रसिकांनीं क्षमा करण्याचें मुळींच कारण नाहीं. कारण ख्रिस्तवासी रे. टिळक यांनीं ‘ बोंबाबोंब ’ ह्या कवितेंत तो उघड उघड उपयोजिला आहे; व तसेंच ‘ पांचजन्य ’ या शिमग्याच्या विशेषांकांत एका शीघ्र कवीनें ‘ मी बोंब मारूं कसा ? ’ म्हणून एका कवितेंत घसा खरडून शंख केला आहे.

कोठुनि मजला चढली धुंदी
काव्योद्यानीं शिरलों नंदी
तिथें न मिळतां कसली चंदी
उलट अंगाशीं डसली मज गांधिलमाशी !

कवी असे मी अगदीं नवखा
म्हणून कोणी निंदक बांका
नांवें माझ्या मारी हांका—
बसुनी राशीं डसली मज गांधिलमाशी !

'अपहारा'नें[२] कविता कांहीं
वाशिला लावुनि छापविल्याही
'उदो' न करितां एकानेंही
मात्र अधाशी[३] डसली मज गांधिलमाशी !

नवीन कसली कृति करतांना
डसती माशा कित्येकांना
घे देवा ! तरि पाहुनि त्यांना—
देउनि फांशीं डसली मज गांधिलमाशी !

****

---

(२) अर्थात् येथें एका प्रसिद्ध कवीच्या नांवाचा 'अपहार' केला होता, हें आधींच सूचित केलेलें बरें ! नाहींतर नागपूर व कोल्हापूर येथील दोन विद्वान् व जाड्या कवि प्रोफेसरांच्या लठ्ठालठ्ठींत हा पुण्याचा नवखा कवि मात्र नाहक चिरडला जायचा !

(३) नुकत्याच तयार झालेल्या 'साहित्या'वर कोणता टीकाकार अधाशीपणाचा हक्क अगोदर गाजवीत नाहीं ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम २३५२५ कि: ३१०५
क्रमांक ९४९२ नों: दि: ३-१-७५

# कविता-गायन

( जाति–बालमुकुंद )

मम कवन कुणा हें गाऊं रासिकांविना ?
क्षण कुणी जरी, श्रवुनि घे तरी, प्रसन्नता ये मना !
मज कवी न कोणी म्हणती कांहीं खरा
वा शाहिर नसुनी गोंधळ करितो पुरा
कीं बेसुर कोणी म्हणती गातो जरा
ह्या अपशब्दांनीं घडति जिवा यातना !
करि ' गिल्ला '[1] कोणी पडावया मी फशीं
क्षणभरांत त्यांची मर्जी जाते कशी ?
अन् त्यांत कोठुनी मिळतां ' अंडी-भजी '
करि जखमेवरतीं प्रताप अपुला चुना !
गंधर्व-कवींचे[2] गान तुम्ही ऐकतां
वा श्वान भुंकतां मुकाटही सोसतां !
मग तुम्हीच माझें ऐका गाणें अतां
' हो दगड-देव तो '–तुमच्यावांचुनि कुणां ?

---

( १ ) साहित्य संमेलनांत अगर कॉलेजांतून कविता–गायनाच्या प्रसंगीं नवख्या कवीवर जो गिल्ला ( Attack ) करण्यांत येतो तो कुणास ठाऊक नाहीं ?

( २ ) ' गंधर्व ' हे कोणी कवि नसून चांगल्यापैकीं काव्य-गायक आहेत असे कवि.

****


१००४२

REFBK-0010042

REFBK-0010042